# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

वर्ष दुसरे १९७४

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

किंमत स.डेतीन रुपये

नगरपालिका नगरवाचनालय कऱ्हाड

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04276
DATE:

वर्ष दुसरे १९७४

923.60954/NAG
Y.C.P LIBRARY
G04275

प्रकाशक :

**श्री. पी. डी. पाटील**

अध्यक्ष

कराड नगरपालिका, कराड.

प्रकाशन :

**श्री. भा. शं. भणगे**

प्राचार्य

चिनाई कॉलेज ऑफ कॉमर्स अँण्ड

एकॉनॉमिक्स, मुंबई

यांच्या शुभहस्ते

१२ मार्च १९७५

मुद्रक :

**वि. रा. भावडीकर**

श्रीदत्त प्रिंटिंग प्रेस,

कराड.



ना. यशवंतराव चव्हाण

# मनोगत

" यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला " ही १९७३ साली सुरू झाली. त्यानिमित्ताने गतवर्षी ज्या थोर विचारवंतांची तीन व्याख्याने झाली; ही मुद्रित प्रत वाचकांच्या हाती देताना मनाला एक समाधान जाणवते.

साहित्य , सौंदर्य, संगीत, क्रीडा, करमणूक या समाजजीवनाला समाधान देणाऱ्या गोष्टी आहेत. शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने कराड नगर-पालिकेने या संदर्भात कराडची एक वैशिष्टयपूर्ण अभिरुची निर्माण केली आहे. त्याचबरोबर आजच्या गतिमान कालखंडात, नव्या पिढीतील समाज-घटकांत चिकित्सक नि अभ्यासू वृत्ती वाढीस लागावी, सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा आणि स्थित्यंतराचा परिचय व्हावा ही निकडीची गरज आहे. समाजातील विचारवंतांचे विचारधन मुक्तपणे उपलब्ध करून देण्याच्या हेतूने ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत असते एका प्रयत्नवादी, अभ्यासू नि यशस्वी अशा सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्वाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हे जन जागरणाचे; संस्काराचे, कार्य आरंभिले आहे !

यशवंतरावजी चव्हाण कराडचे सुपुत्र आहेत, अखिल भारतीय नेतृत्व त्यांच्या परिश्रमांना लाभलेले फळ आहे. त्यांचा वाढदिवस हा प्रत्येक कराड-कराच्या जीवनातील एक महत्त्वाच्या भावनेने हेलावणारा दिवस आहे.

यशवंतरावजी चव्हाण यांच्या स्वरूपात दिसणारे हे नेत्रदीपक प्रज्ञाप्रचीतीचे राजकीय आणि सामाजिक व्यक्तिमत्त्व कलेकलेने साकारत गेले; त्याचा विचार नि उच्चार समाज परिवर्तनाला उपकारक ठरेल या भावनेने त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात निश्चित औचित्य आहे ! सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा परिचय होत

होत राहिला; विचारविवेक-विमर्ष या विचार मंथनाच्या प्रक्रिया व्यक्तीच्या जीवनावर जर संस्कार करून गेल्या तर कोणता सामाजिक आविष्कार दिसू शकतो त्याचे यशवंतरावजी चव्हाण हे मूर्तिमंत उदाहरण आहे !

जन्मतः पारंपरिक, सामाजिक किंवा आर्थिक सुबकतेचे वा प्रतिष्ठेचे आवरण यशवंतरावजींना लाभले नाही. प्रतिकूलतेची पाठशिवणी सतत चालू असताना, आत्मविश्वासानें, अभ्यासू वृत्तीने त्यांनी आपले ' ज्ञान दालन ' प्रयत्नपूर्वक समृद्ध केले. ध्येयपूर्तीसाठी ठामपणे उभे राहून, अविचल मनोनिग्रहाने त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची साक्ष पटवली आहे. आकांक्षेकडे झेप घेणारी निष्ठा, वाणी, करणी त्यांच्या विद्यार्थीदशेतील साधना आहे ! म्हणूनच नव्या पिढीने त्यांच्या व्यासंगाचा नि प्रयत्नवादाचा अभ्यास केला पाहिजे असे वाटत राहाते.

भारतीय सामाजिक नि राजकीय क्षेत्रात ते " एक विचार " म्हणून गौरवले जातात. पण ही त्यांना लाभलेली ईश्वरदत्त गोष्ट नाही, त्यांचा हा होणारा गौरव त्यांनी सतत व्यासंगाने, चिकित्सक वृत्तीने नि अभ्यासाने आत्मसात केलेली " साधना " आहे. भावी काळाचा अचूक वेध घेणारी त्यांची प्रज्ञा, त्यांच्या एकाग्र चिंतनाची परिणती आहे. बालवयातही सवंग लोकप्रियतेचा मोह त्यांना झाला नाही. सत्यशोधक सामाजिक चळवळीच्यापेक्षा काँग्रेसच्या व्यापक ध्येयधोरणाचा परिचय करून घेण्यात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले होते; भावनेपेक्षा विचाराला शरण जाणे ही त्यांची वृत्ती त्यांच्या राजकारण पटुत्वाची यशोध्वजा ठरली !

राजकारण असो, समाजकारण असो, अर्थकारण असो कोणत्याही गंभीर समस्येचा विचार एकाग्रतेने करावा. आपल्या सहकारी मित्राबरोबर साधक-बाधक चर्चा करावी आणि भावनावश न होता जो निर्णय तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ आहे तो शिरोधार्य मानून कोणत्याही परिणामाची मुलाहिजा न ठेवता त्याचा पाठपुरावा करावा हा यशवंतराव चव्हाणांचा स्वभावविशेष आहे !

क्वचित स्वतःच्या मनाला किंवा सहकाऱ्याच्या मनाला क्लेशकारक निर्णयही एकदा तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ नि अंतिम श्रेयस्कर आहे अशी खात्री झाली की तो प्रथम उच्चारण्याचे मनोधैर्य यशवंतरावच दाखवू शकतात ! या विज्ञानयुगातील गणक यंत्रातून बाहेर पडणारे बिनचूक उत्तराइतके अचूक निर्णायक उत्तर स्वीकारण्याची त्यांची मानसिक तयारी त्यांच्या

प्रज्ञेचा चमत्कार वाटतो. राजकारणातील अत्यंत नाजूक नि अत्यंत कठीण प्रसंगी अनेकवेळा याचा पडताळा आला आहे.

परिस्थितीचे आव्हान स्विकारण्याची त्यांची तयारी स्वत:च्या व्यासंगावरील नि अभ्यासू धारणेवरील जबरदस्त विश्वासच ! मुंबई राज्याचा, महाराष्ट्र राज्याचा नि भारताच्या राजकारणातील त्यांच्या धाडशी भूमिकांची ओळख सर्वांनाच जवळून झालेली आहे. राजकीय वा सामाजिक चळवळीची परिणिती कोठे थांबेल याचे अचूक निदान यशवंतरावजी करू शकतात ; अशावेळी त्यांची शोधक दृष्टी आपल्या निदानाचे समर्थन करताना बोधक ठरते. पंडितांच्या सभेत तर्कशुद्ध नि समर्पक दाखल्यांनी बिनतोड युक्तिवाद करणारी त्यांची भाषाशैली; राजकीय किंवा सामाजिक व्यासपिठावर खास प्रासादिक नि प्रादेशिक लेणे घेऊन, जनसामान्यांच्या मनाचा कब्जा करते!

काँग्रेसचा एक सैनिक म्हणून घेण्यात यशवंतराव स्वत:ला धन्य समजत आलेले आहेत. पण ते सैनिक आहेत त्याही पेक्षा ते कुशल संघटक आहेत. सतत कार्यकर्त्यांचा संच उभा करून त्यांना ध्येयनिष्ठेने आणि कार्य प्रेरणेने गतिमान करण्यात त्यांना लाभणारे यश इतरांनी हेवा करावा असे आहे !

यशवंतराव चव्हाण यांचा जीवनलेख चढता वाढता आहे; पण तो त्यांनी अनुभवलेल्या सामाजिक, राजकीय क्रिया–प्रतिक्रियांचा परिपाक आहे.

या व्याख्यानमालेतील व्याख्यानांतून यशवंतरावांच्या जीवन–चरित्राची चर्चा होत रहावी हा प्रधान हेतू नाही. तर आज ज्या भारतीय समाजाच्या नि राष्ट्रीय जीवनाच्या समस्या आव्हानाचे स्वरूप घेऊन आपल्यापुढे उभ्या ठाकल्या आहेत त्या सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा अभ्यास पूर्ण ऊहापोह अधिकारी व्यक्तींच्या नियोजित व्याख्यानांतून व्हावा, हाच प्रधान हेतू या व्याख्यानमालेचा आहे.

समस्यांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचे धैर्य नव्या पिढीने, यशवंतरावांच्या सहृदयतेने व अभ्यासू वृत्तीने दाखवावे. यशवंतरावांच्या एकाग्रतेने प्रत्येक समस्येचे मनन, चिंतन करावे, यशवंतरावांच्या तर्कशुद्ध विचार पद्धतीने स्वत:चे निष्कर्ष काढावेत आणि यशवंतरावांच्या ध्येयनिष्ठेने व जिद्दीने ते निष्कर्ष व्यवहारात आणावेत ! यशवंतरावांच्या भक्तिभावाने समाजाची नि मातृभूमीची सेवा करावी हीच उत्कट भावना यामागे अनुस्यूत आहे !!

यशवंतरावांचे जीवन चरित्र हे नव्या पिढीला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणारे आहे. म्हणूनच नामदार यशवंतराव चव्हाण यांचे जीवन हा अभ्यासाचा विषय आहे, महाराष्ट्रातील सामाजिक नि राजकीय चळवळीचे प्रवाह समजून देणारा एक जीवनस्रोत खळाळून पुढे धावतो आहे अशा गतिमान व्यक्तिमत्त्वाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जनजागरणाचा उपक्रम सुरू करावा; त्यांच्या अभिष्टचिंतनाबरोबरच विचारचिंतनाला सुरुवात करावी म्हणून हा सुयोग साधला आहे !

आमच्या निमंत्रणाला मान देऊन माननीय प्रा. ए. एम्. खान, पुणे, माजी न्यायमूर्ती वि. अ. नाईक. पुणे आणि श्री. सदाशिव बागाईतकर, पुणे या थोर विचारवंतांनी एक एक विचाराचे कोरीव लेणे मराठी मनावर कायमचे कोरून ठेवले आहे. त्या सर्वांचे कृतज्ञ आभार मानणे आमचे कर्तव्य आहे !

थोर शब्दांचे हे 'अक्षर' स्वरूप प्रकट होताना प्रा. वि. पु. गोखले व श्री. श्रीनिवास कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले आहेत. कराडमधील या दोन्ही साहित्यसेवकांचा अशा कामावरील लोभ, उपक्रमांना रेखीव रूप देणारा ठरतो. म्हणून त्यांचे सप्रेम आभार मानताना आपलेपणाचा आनंदही साठलेला असतो.

श्रीदत्त प्रिंटींग प्रेसचे व्यवस्थापक नि कामगार यांनी ही पुस्तिका वेळेवर व सुबक छापून दिली त्याबद्दल आभारी आहे.

या व्याख्यानमालेत जे जे विचारमंथन, चिंतन होईल ते ते त्याच विचारवंतांच्या भाषेत 'अक्षर' करण्याच्या हेतूने प्रतिवर्षी व्याख्यानांची पुस्तिका प्रसिद्ध केली जावी हाही हेतू आहे. गेल्या वर्षीच्या व्याख्यानाची ही दुसरी पुस्तिका समाज पुरुषाच्या हाती देताना एकच प्रार्थना–

ना. यशवंतरावजींना राष्ट्रसेवेसाठी उदंड आयुरारोग्य लाभो ! त्यांच्या जीवनाचा आदर्श नव्या पिढीला जीवनाची विधायक दृष्टी देणारा ठरो !

कराड
१२ मार्च १९७५

पी. डी. पाटील
नगराध्यक्ष.

→←

# अंतरंग

१०-३-१९७४

**भारतीय लोकशाही : काही विचार**

प्रा. ए. एम्. खान

*श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे.*

पृष्ठे १ ते १४

•

११-३-१९७४

**लोकशाही समाजवाद**

श्री. वि. अ. नाईक

न्यायमूर्ती, पुणे.

पृष्ठे १५ ते २४

•

१२-३-१९७४

**अविकसित देशातील समाजवादाचे स्वरूप**

श्री. सदाशिव बागाईतकर, पुणे.

पृष्ठे २५ ते ४१

•

१०-३-१९७४

# भारतीय लोकशाही : काही विचार

प्रा. ए. एम्. खान

*श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे.*

# भारतीय लोकशाही : काही विचार

अध्यक्ष महाशय आणि सन्मित्रहो :

' यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेचे ' पहिले पुष्प गुंफण्यासाठी आपण मला या ठिकाणी निमंत्रित केले याबद्दल खूप आनंद वाटतो. या व्याख्यानमालेतर्फे निरनिराळ्या वक्त्यांना बोलावून त्यांची निरनिराळ्या विषयांवर सलग तीन व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. व्याख्यानमाला सुरू करण्याचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.

माननीय यशवंतराव चव्हाण यांचे कर्तृत्व आणि नेतृत्व फार मोठे आहे. यामुळे त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने येथे येण्यामध्ये त्यांच्याबद्दलची माझी आदराची व कृतज्ञतेची ही भावना आहे.

आपला विषय मी चिकित्सक बुद्धीने, तटस्थवृत्तीने आणि सूत्ररुपाने मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. जी. डी. एच. कोल या विख्यात अर्थशास्त्रज्ञाने म्हटले आहे की व्याख्यात्याने आपल्याला जे काही सांगायचे आहे त्याची त्याने अगोदर स्पष्ट कल्पना द्यावी. त्यानंतर त्याला जे सांगावयाचे आहे ते त्याने सांगावे व शेवटी जे काही सांगितले त्याची उजळणी करावी. हे सूत्र माझ्या आजच्या व्याख्यानाला लावण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

माझा आजचा विषय " भारतीय लोकशाही : काही विचार " असा आहे. ' लोकशाही ' या शब्दाचा अर्थ सर्वांना माहित आहे. त्याबद्दल येथे विस्तृतपणे सांगण्याचे प्रयोजन नाही. पण ' काही विचार ' या शब्दात संदिग्धता आहे. त्यामध्ये मला जे आज सांगावयाचे आहे त्याची रूपरेषा

देणे आवश्यक आहे. भारतीय लोकशाही यामधील अभिप्रेत अर्थ, त्यातील आशय, त्याचप्रमाणे येथील लोकशाही पद्धत व लोकशाहीची यंत्रणा आणि आजच्या भारतीय लोकशाहीपुढे असणाऱ्या अडीअडचणी, समस्या विशेषतः आर्थिक, सामाजिक व कायदा आणि सुव्यवस्था याबद्दलची आव्हाने, या मुद्यांवर बोलण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

## लोकशाहीचा आशय :

**भारतीय लोकशाही :** भारतीय लोकशाहीचा विचार करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की सर्व जगामध्ये लोकशाहीची म्हणून जी मूल्ये आहेत ती मूल्ये भारतीय लोकशाहीमध्ये आपण गेली पंचवीस वर्षे रुजवीत आहोत. स्वातंत्र्य, समता, न्याय ही ती महत्त्वाची मूल्ये होत. लोकशाही या शब्दाचा आशय मोठा आहे. त्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्ति-स्वातंत्र्य होय. लोकशाहीची मूल्ये व त्यांतही हे व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य अध्यात्मिक आहे. मानवप्रेम, जीवनप्रेम अभिप्रेत असणारे हे खऱ्या अर्थाचे अध्यात्मिक मूल्य आहे. अध्यात्म या शब्दाचा नेहमीचा सर्वसामान्य रूढ अर्थ येथे घ्यावयाचा नाही. व्यक्तिस्वातंत्र्याच्या या अत्यंत महत्त्वाच्या तत्त्वामुळेच असे म्हटले जाते की लोकशाही ही केवळ राज्यपद्धती नव्हे तर ती एक जीवनपद्धती आहे. लोकशाहीचे स्वातंत्र्य म्हणजे संघटनेचे स्वातंत्र्य, जमावाचे स्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य होय. लोकशाही म्हटले की बंधुभाव, समता, न्याय या गोष्टी आल्याच. पण भारतीय लोकशाहीचे वैशिष्टच म्हणून जे मला सांगावेसे वाटते ते म्हणजे भारतीय लोकशाहीची धर्मनिरपेक्षता. धर्म-निरपेक्षता याचा अर्थ अधार्मिकता नव्हे. धर्माला आपण मानत नाही असा याचा अर्थ नाही. धर्मनिरपेक्षता याचा अर्थ सर्वधर्म–समभाव असा आहे. राजकारणामध्ये धर्माला कोणतेही स्थान नाही. कुठल्याही धर्माला त्यात स्थान नाही. आपण सद्सद्विवेक बुद्धीने, सल्लामसलतीने, सूज्ञपणे एखादा निर्णय घ्यावा व त्याप्रमाणे धोरण ठरवावे. बुद्धिप्रामाण्याच्या निकषावरून जे काही योग्य असेल ते जनसेवेसाठी करावे यात खरा मानवधर्म आहे. आणि याचा स्वीकार भारतीय लोकशाहीने केला आहे.

**लोकशाहीपद्धत :** भारतीय लोकशाहीच्या विचाराच्या संदर्भात रजनी कोठारी या विचारवंताने लिहिलेल्या Party System in India या ग्रंथाचा उल्लेख करणे इष्ट होईल. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे भारतामध्ये एकपक्ष वर्चस्व पद्धत ( one party dominance systen. ) आहे.

एका पक्षाचे वर्चस्व म्हणजे काँग्रेस पक्षाचे वर्चस्व हे ओघाने आले. काँग्रेस-पक्ष पूर्वी राजकीय पक्ष नव्हता. स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेस हे जनतेचे आंदोलन होते. जनतेची चळवळ होती. याचाच अर्थ असा की भारतीयांच्या आशा-आकांक्षाशी काँग्रेस निगडित होती. स्वातंत्र्य मिळाल्यावर काँग्रेस संघटना राजकीय पक्ष म्हणून पुढे आली. अशा तऱ्हेने काँग्रेस पक्षापुरतेच बोलायचे झाले तर हा पक्ष भारतीयांच्या आशाआकांक्षांचा प्रतीक म्हणून आहे. काँग्रेस पक्ष सर्वंकष व सर्वसमावेशक असा आहे. त्यामुळे त्याचे वर्चस्व असणे स्वाभाविक आहे. हा पक्ष एकमताने निवडून आलेला पक्ष ( a party of consensus ) आहे. या पक्षापुढे काही कार्यक्रम ( a party of programme ) आहे. या पक्षामध्ये कृतिशीलता ( a party of action ) आहे. याच्याविरुद्ध दुसरा पर्यायी पक्ष नाही असे दिसून येते. बाकीचे सर्व पक्ष फक्त व्यासपीठापुरते ( parties of platform ) आहेत. कारण त्यांच्याकडून फक्त विरोधच होत असतो. असे असणे योग्य नाही. लोकशाहीच्या दृष्टिकोनातून पाहिले तर अेका पक्षाचे वर्चस्व असणे धोकादायक आहे असे भय बाळगण्याचे कारण नाही. नुकतीच उत्तरप्रदेशा-मध्ये निवडणूक झाली. या निवडणुकीचा निकाल पाहिला तर असे दिसून येईल की यापूर्वी तेथे जे यश काँग्रेसला मिळाले त्याच्या तुलनेने सध्याचे यश जास्त आहे. हा जनतेने दिलेला निर्णय आहे.

**पक्षबल** : दोन पर्यायी पक्ष तुल्यबळ असले की अस्थिरतेचाही प्रश्न निर्माण होतो असे दिसून येते. सध्या ब्रिटनमध्ये हुजूरपक्ष व मजूरपक्ष हे तुल्यबळ झाले आहेत. त्यामुळे ते सरकार केव्हा कोलमडेल हे सांगता येत नाही. तेथील विचारवंत आता म्हणू लागले आहेत की ब्रिटनमध्ये सर्वांचे मिळून एकच राष्ट्रीय सरकार स्थापावे. ब्रिटनची ही लोकशाही यंत्रणा पाहिली तर असे दिसून येते की अगदी कमी संख्येच्या फरकामुळे दोन पक्षांच्या तुल्यबलतेतून राजकीय अस्थिरताच निर्माण होते.

**सेवावृत्ती** : लोक मतदान करतात व लोकप्रतिनिधी निवडून येतात. या प्रतिनिधींमधून थोडेच लोक अधिकारपदावर येतात; आणि त्यांच्याकडून सत्ता राबविली जाते. तेव्हा साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की थोड्या लोकांच्या हाती सत्ता असल्याने त्यापासून काही धोका निर्माण होतो का ? पण ज्यावेळी सेवावृत्ती असते त्यावेळी अशाप्रकारे सत्ता हाती आली तरी ती सत्ता राबविण्यापासून भय नाही. यामध्ये सेवावृत्ती महत्त्वाची आहे.

ब्रिटनचे पंतप्रधान हीथ यांनी राजिनामा दिल्यानंतर १० डाऊनिंग स्ट्रीट हे आपले निवासस्थान सोडून ते तेथून तात्वडतोब दुसरीकडे राहावयास गेले. इंग्लंडच्या या पंतप्रधानाला स्वत:चे घर नाही. हे आपल्या नुकतेच वाचनात आले असेल. मागे पंतप्रधान मॅकमिलनने जेव्हा राजीनामा दिला तेव्हा आपला फोन तोडू नये म्हणून विनंती केली. पण फोन तोडण्यात आला. त्यांनी पुन्हा विनंती केली की मी दवाखान्यात आहे तोपर्यंत फोन तोडू नका. पण कायदा तो कायदा असे उत्तर त्यांना मिळाले. याबाबतीत मा. यशवंतराव चव्हाण यांचेही उदाहरण उल्लेखनीय आहे. ज्यावेळी ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांनी " मी या महाराष्ट्राचा पहिला चाकर आहे," असे उद्गार काढले. ही सेवावृत्ती असेल तर कितीही मोठी सत्ता प्राप्त झाली तरी त्यापासून धोका निर्माण होण्याचे कारण नाही.

**लोकांचे कर्तव्य** : अशी सेवावृत्ती लोकप्रतिनिधींमध्ये असली पाहिजे. लोकशाही राबवावयाची म्हणजे ती आपण सर्वांनीच राबवली पाहिजे. ते आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. एकदा मते दिली की आपले काम संपले असे कोणी समजू नये. मत देणे हे प्राथमिक कर्तव्य आहे. येथून पुढे खरे प्रत्यक्ष काम.

**प्रशासकांचे कर्तव्य :** लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यामध्ये जो मोठा दुवा आहे तो म्हणजे प्रशासकांचा. त्यांनीही आपले कर्तव्य अत्यंत निष्ठेने केले पाहिजे. प्रशासकांनी आपल्या कामात ढिलाई अगर बेफिकिरी दाखवून चालणार नाही. जर बेफिकिरी असेल तर चांगली ध्येय-धोरणे राबवता येणे शक्य नाही. लोकशाही अत्यंत प्रभावी व्हावयाची असेल तर लोक-प्रतिनिधी आणि जनता यांचेमधील जो प्रशासकांचा दुवा आहे त्याने निष्ठेने काम केले पाहिजे. हे माझे काम नाही. मी हे काम माझ्या सवडीने करीन अशी प्रवृत्ती राज्यकारभारास पोषक नाही. तिटकारा, तुसडेपणा, आळस, विलंब झटकून समाजहितासाठी काम करणे आवश्यक आहे. हा माझा समाज आहे, ही माणसे माझी आहेत या आपुलकीने काम केले पाहिजे. कामातील सचोटी व क्षमता यामुळे मोठी कामेही अनायासे पार पडतात.

## समस्या व आव्हाने :

**आर्थिक विषमता** : आज लोकशाहीला सर्वांत मोठे आव्हान आहे ते आर्थिक विषमतेचे. आपल्याकडे फार दारिद्र्य आहे. समाजवादामध्ये अन्न,

निवारा, शिक्षण, आरोग्य या मूलभूत गोष्टी येतात. या लोकांच्या गरजा आहेत व त्या भागविल्या पाहिजेत. आणि हा फार मोठा प्रश्न आपल्यापुढे आहे. आपल्या देशात दरडोई वार्षिक उत्पन्न चारशे रुपये आहे. खालच्या वर्गाचे दरडोई उत्पन्न दरमहा सात रुपये म्हणजे दररोजचे तीन–चार आणे आहे. अमेरिका, रशिया येथे दरडोई वार्षिक उत्पन्न चार ते पाच हजार आहे. यावरून आपल्याकडच्या दारिद्र्याची कल्पना येते.[१] शिवाय जी आर्थिक विषमता आहे त्यामध्येही फार मोठा फरक आहे. तिकडे विषमतेचे प्रमाण १० पटीने म्हणजे १ : १० असेल तर आपल्याकडे ते १०० पटीने म्हणजे १ : १०० असे आहे. किंवा त्याची तुलनाच करता येणार नाही.[२] मुंबईतील एखादा भिकारी व हवेलीतील श्रीमंत यांची तुलना कशी होऊ शकेल ? मुंबईमध्ये फुटपाथवर राहाणारे लाखो लोक आहेत. तेथील झोपडपट्टीमध्ये[३] राहणारे जवळ जवळ १५ लाख लोक आहेत.

---

१ पाच लाख रुपयांवरील एकूण इस्टेटीवर शासनाचे आवश्यकतेनुसार नियंत्रण असावयास हरकत नाही.

२ आलिशान हॉटेलमध्ये पाचशे रुपये एकावेळचे भोजन–बिल देणारा धनिक व रस्त्यावर पडलेले उष्टे आईस्क्रीम पॉट चाटणारे गरीब बालक याची तुलना होऊ शकत नाही. हजारो लोकांची बसण्याची व्यवस्था वातानुकूलित ( air-conditioned ) करण्यासाठी बर्फाच्या लाद्यांच्या भिंती उभारू शकणारे लोक आपल्याकडे आहेत.

३ झोपडपट्टी वाढते याचा अर्थ प्रत्यक्ष झोपडी अनधिकृतपणे बांधली जात असता त्याकडे दुर्लक्ष होते. त्या बांधकामाचा खूप विस्तार झाला की ते उठविणे अवघड व अन्यायाचे होते. अशी बेकायदेशीर बांधणी मुळातच होऊ देऊ नये व आता जी आहे तिचे योग्य पुनर्वसन झाल्यानेच झोपडपट्टीचा प्रश्न सुटणे शक्य आहे. आहेत तेथेच गाळे बांधून देणे, जी मूळ झोपडी आहे तिचेच घरकूल तयार करून देणे हे योग्य पुनर्वसन असू शकेल. खूप पैसा खर्च करूनही प्रश्न संपणार नाही. पण योग्य पद्धतीने आधुनिक मटेरियल वापरून कमी खर्चात हा मोठा प्रश्न आटोक्यात येण्यासारखा आहे. टेलिव्हिजन किंवा टेलिफोनची सोय करून झोपडपट्टीत सुख येणार नाही. त्यांचे नेमके दुःख जाणून त्याचेच निराकरण केले पाहिजे.

**बेकारी** : दिवसेंदिवस बेकारी वाढत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत २५० लक्ष लोक बेकार होते. चौथ्या योजनेत त्यात वाढ झाली. शेतकरीसुद्धा वर्षातून जवळ जवळ १५० दिवस बेकार असतो. एखादी जागा असेल तर त्यासाठी हजारो अर्ज येतात. बेकारीमध्ये सतत वाढ होत जाते. दारिद्र्य आणि बेकारीचा हा फार मोठा प्रश्न आपल्याकडे आहे.[४]

**अन्नधान्य प्रश्न** : आर्थिक विषमतेच्या बाबतीत दुसरा प्रश्न म्हणजे अन्नधान्याचा प्रश्न. अन्नधान्याच्या बाबतीत दोन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्या म्हणजे अन्नधान्य उत्पादन व अन्नधान्य वितरण. आपल्या देशामध्ये जवळ जवळ ८१ कोटी एकर जमीन आहे.[५] त्यापैकी २५ कोटी

---

४ प्रादेशिकता व वशिलेबाजी यामुळेही काही प्रमाणात कृत्रिम बेकारी निर्माण होते.

५ १९६९ च्या पाहणीनुसार अमेरिकेत शेतीसाठी ५६००००० ट्रॅक्टर्स वापरले जातात भारतात फक्त १००००० वापरले जातात. १ : ५६ हे प्रमाण पडते. जलसिंचाईखालील (irrigated land) अमेरिकेतील जमीन ३२०००००० एकर आहे तर भारतातील ६८०००००० एकर आहे.

अमेरिका, रशिया व चीन या देशांनी शेती उत्पादनात खूप प्रगती केली. सध्या रशियामध्ये ३५६०० सामूहिक शेते ( Collective Farms ) १३४०० सरकारी शेते (State Farms) आहेत. यासाठी २०००००० ट्रॅक्टर्स, १२००००० लॉरीजपेक्षा जास्त साधनांचा वापर केला जातो. या शेतांवर २०००००० यंत्र चालविणारे ६००००० ड्रायव्हर्स व ३०००००हून जास्त माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घेतलेले तज्ञ काम करतात. शेतावर काम करणाऱ्या बहुसंख्य कुटुंबांना नवीन घरे आहेत. यापैकी ९८% टक्के घरात वीज आहे. भारतामध्ये शेतीचा प्रयोग ( State-Farming ) शासनाकडून स्वतंत्रपणे व्हावयास हरकत नाही. संपूर्ण देशात काही कोटी एकर शेती सरकारी शेती म्हणून करता येण्यासारखी आहे तालुकानिहाय, जिल्हानिहाय, राज्यनिहाय अशा चढत्याक्रमाने शासन-संचलित राखीव शेती नव्याने करता येणे इष्ट होईल असे वाटते. मोठी गुंतवणूक आहे हे खरे पण हा फार मोठा व्याप हाती घेणे अंतिम हिताचेच होणार आहे. →

एकर जमीन शेतीची आहे. २५ कोटी शेतकरी जमीन कसतात. म्हणजे शेतकऱ्याकडे सरासरी एक एकर जमीन आहे. ही सरासरी झाली. काहींच्याजवळ शेकडो एकर आहे तर काहींच्याजवळ अजिबात नाही. आपल्याकडे सरासरी एक एकर तर अमेरिकेच्या शेतकऱ्याजवळ सरासरी १४८ एकर जमीन आहे. हा प्रकार पाहिला तर असे दिसून येते की या ठिकाणचा शेतकरी हा दुबळा घटक आहे. शेती करणारा जो कोणी असेल त्याला जास्तीतजास्त सहाय्य दिले पाहिजे. त्याला समर्थ बनविण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. यासाठी अद्यावत साधनसामुग्रीचा उपयोग केला पाहिजे. आणि शिवाय सहाय्याची तरतूद अधिक वाढविली पाहिजे. शेतीकडे आपण व्यापारी किंवा धंद्याच्या दृष्टीने पाहतो. व्यापारी किंवा नगदी पिके काढतो. याऐवजी अन्नपिके जास्त पिकविण्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. धान्य पिकले तरी ते मिळत नाही. गहू जास्त पिकला तरी तेवढा पदरात पडत नाही. जिल्हाबंदी, प्रांतबंदी या नियंत्रणामुळे जनतेपर्यंत तो येऊ शकत नाही. तेव्हा लोकांचे असे म्हणणे असते की ही नियंत्रणे काढली पाहिजेत आणि बाजार खुला केला पाहिजे. प्रत्येकाला अन्न मिळाले पाहिजे ही शासनाची जबाबदारी आहे. अन्नधान्याचा व्यापार करावा ही त्याची जबाबदारी नाही. खेड्यापाड्यात बाजार भरतात, त्यांनासुद्धा आठवड्यातून एकच दिवस नेमून द्यावयाचा अशी एक बातमी आली ती आपण वाचली असेल. प्रत्येक खेड्यास वेगळा दिवस अशी पूर्वीची प्रथा बंद करावयाची अशी ती बातमी. असा व्यापारात कृत्रिमपणा नको. खुलेपणा हवा. तसे झाले तर अन्नधान्याच्या बाबतीत सुकरता प्राप्त होईल. धान्य उत्पादन (Production) व धान्य संपादन (Procurement) यांसाठी खेडे घटक धरण्यात आले पाहिजे. याचा अर्थ खेडे धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले पाहिजे. असे झाले म्हणजे खेड्याचे वरकड (Surplus) धान्य तालुक्यापर्यंत, तालुक्याचे जिल्ह्यापर्यंत, जिल्ह्याचे प्रांतापर्यंत व प्रांताचे मध्यवर्ती सरकारपर्यंत जाईल. अलीकडे बोर्लो या अमेरिकन कृषितज्ञाने तर अन्नवितरणाचा विचार एका देशापुरता करून चालणार नाही, तो सर्व जगाचा प्रश्न आहे असे म्हटले आहे. आपल्यापुरते

---

→ १९६७–६८ च्या पाहणीनुसार भारतातील जमिनीचा प्रकार खालीलप्रमाणे आहे. पडीक जमीन २२६००००० हेक्टेअर्स, पिकाची जमीन १५६५००००० हेक्टेअर्स, चराऊ कुरणाचे क्षेत्र १४१००००० हेक्टेअर्स व जंगलाचे क्षेत्र ६२४००००० हेक्टेअर्स.

ओलावयाचे तर धान्य संपादनाबद्दलच्या आपल्या धोरणात खेडे हे घटक धरले पाहिजे व ते उपयुक्त ठरेल तसेच वितरणाबद्दल माणूस घटक धरला पाहिजे. शहरी माणसाला आठ किलो आणि खेडयातील माणसाला दोन किलो हा भेद असता कामा नये. माणूस हा खरा घटक धरला पाहिजे. आपण असे केले तर अन्नधान्याचा प्रश्न सुटण्यासारखा आहे. [६]

**महागाई** : महागाईचे एक दुष्टचक्र आहे. दरवर्षी महागाई वाढत आहे. किंमती वाढल्या की वेतनवाढ होते; वेतनवाढ झाली की करवाढ करावी लागते; करवाढ झाली की पुन्हा भाववाढ. अशा तऱ्हेने हे दुष्टचक्र वाढत जाते ते थांबविले पाहिजे. याकरिता किंमतींचे स्थिरीकरण (Stabilization) झाले पाहिजे. चलनाचे मूल्य घटविणे ( Demonetisation ) हा एक मार्ग सुचविण्यात येतो. कागदी चलनामध्ये ५० टक्के चलन १०० रुपये नोटांचे व पुढचे आहे. त्याचे मूल्य घटविले पाहिजे. म्हणजे या सर्व नोटा सरकारच्या ताब्यात येतील आणि अनाठायी फुगलेल्या संपत्तीला आळा बसेल, असा त्याचा अर्थ.

---

६ अन्नतुटवडयाच्या संदर्भात वाढत्या लोकसंख्येचा उल्लेख करण्यात येतो. आणि ते बरोबर आहे. वाढत्या लोकसंख्येस आळा घातला पाहिजे. पूर्वापार चालत आलेल्या अनेक समजुतींना दूर करून प्रत्येकाने आपले कुटुंब सुटसुटीत, सुदृढ, सुखी व आनंदी केले पाहिजे. मुलांचे नीट संगोपन करणे हे आईवडिलांचे कर्तव्य आहे. सर्व तऱ्हेचे वैद्यकीय सहाय्य मोठ्या प्रमाणात पोहोचविण्याचे निरनिराळे सुलभ उपाय शोधून राबविले पाहिजेत. आज आपल्या देशात दररोज ५७००० मुले जन्मास येतात. सबंध देशाची लोकसंख्या आज ६० कोटीपर्यंत पोहोचली आहे ती २००० इ. स. मध्ये १०० कोटी होईल असे तज्ञांचे मत आहे.

सारासार विचार करता विवाहास योग्य असे वय मुलांसाठी २५ व मुलींसाठी २० वर्षे धरल्यास व याप्रमाणे विवाहाची वयोमर्यादा कायद्याने वाढविल्यास इष्ट परिणाम होईल. मुलगा व मुलगी यांना समान लेखून जास्तीत जास्त दोन अपत्यांवर समाधान मानणे हितदायी होईल. वयाच्या ६० व्या वर्षी मुलाचे वय २५ असेल तर ते दोघांनाही समाधानकारक ठरेल. म्हणजे शक्यतो वयाच्या ३५ च्या पुढे मूल न होणे अधिक बरे. अशा उपायांनी लोकसंख्येस आळा घातला गेला पाहिजे.

**उत्पादनवाढ :** परंतु खरे म्हणजे विषमता दूर करण्यासाठी वस्तूंचे जास्तीतजास्त उत्पादन [७] झाले पाहिजे. म्हणजे त्या लोकांपर्यंत जाऊ शकतील.

**काळा पैसा :** आज काल काळ्या पैशाबद्दल नेहमी ऐकिवात येते. वास्तविक जे जे अप्रामाणिकपणे मिळविलेले असते त्याचा समावेश काळ्या पैशात होतो. या पैशाचा कोठे हिशेब नसतो. यामुळे सर्व अर्थव्यवस्थेवर व आर्थिक परिस्थितीवर अनिष्ट परिणाम होतो. काळा पैसा ही एक समांतर अर्थव्यवस्था ( Parellel economy ) बनते. बेनेडाइट कॉस्टा याने आपल्या India's Socialist Princes & Garibi Hatao या पुस्तकात लिहिले आहे की ५० कोटी रुपयांचा काळा पैसा मुंबईतील नुसत्या चित्रपटसृष्टीत आहे. लाचलुचपत, भ्रष्टाचार यामुळे तसेच परदेशी मौल्यवान वस्तूंच्या चोरट्या व्यापारामुळे ( Smuggling ) काळा पैसा जमतो आणि मग सामाजिक व आर्थिक विषमता निर्माण होते. तेव्हा हा काळा पैसा नष्ट झाला पाहिजे. म्हणजे आपल्या अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होणार नाही. जर आर्थिक विषमता टाळता येत नसेल तर न्याय मिळणार नाही. ज्या ठिकाणी पैसा आहे त्या ठिकाणी न्याय आहे असे होऊन बसते. भ्रष्टाचारात करचुकवेपणा घडतो. संथानम कमेटीने दिल्याप्रमाणे सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूच्या एका अनधिकृत अंदाजाप्रमाणे करचुकवेपणाचा पैसा दरवर्षी सुमारे २३० कोटी रुपयांपर्यंत असतो.

**नियोजन** : काही लोक म्हणतात की नियोजनालाच ( Planning ) आराम द्यावा किंवा विराम द्यावा. हे नियोजनच बंद करावे. पण ही अगतिक व एकांगी अशी भूमिका आहे. नियोजनाद्वारा आपण बरेच साधू शकतो. मात्र

---

७ आवश्यक वस्तू ( Essential Commodities ) योग्य दरात व योग्य प्रमाणात सर्वांना मिळणे महत्त्वाचे आहे. ते शासकीय पातळीवर होऊ शकते. व्यापारी हा जबरदस्त शोषक असतो; हे आपणास दररोजच्या व्यवहारात दिसून येते वस्तू महाग होणे, गायब होणे, भेसळ होणे, वजनमापात फसविणे, दलाली करणे अशा अनेक रीतीने तो जनतेचे शोषण करीत असतो. जनता सुखी राहण्यासाठी व्यापारातील अप्रामाणिकपणावर कडक नियंत्रण हवे. तेल, दूध, धान्य, कपडा व निवारा या आवश्यक गोष्टींच्या दरातील व प्रमाणातील वाजवीपणा सामान्य जनतेच्या सुखास कारणीभूत होईल.

हे करण्यासाठी वर्तमानकाळावर आपण नजर ठेवली पाहिजे. आपले भविष्य उज्ज्वल झाले पाहिजे हे निश्चित. पण याचा अर्थ वर्तमानकाळाच्या गरजांचा विसर पडता कामा नये. रोजच्या जीवनातील साधे उदाहरण घेऊ. आपले भविष्य उज्ज्वल असावे यासाठी आपण बचत करतो पण बचतीचे प्रमाणही ठरवितो. शक्य व वाजवी बचत करतो, वर्तमानकाळ दुःखी करून भविष्यातील सुखाची सारखी चिंता आपण करीत नाही. देशाच्या आर्थिक नियोजनाच्या बाबतीत वर्तमानकाळावर जास्तीतजास्त लक्ष दिले गेले पाहिजे. असे झाले तर नियोजन वास्तव झाल्याशिवाय राहणार नाही. नियोजनाकडे पाहण्याची दृष्टी अतिशय सैद्धांतिक ( Theoretical ) असून भागणार नाही. ती टिकावू होण्यासाठी व्यवहारी असली पाहिजे. तिचा जास्तीतजास्त उपयोग करून नियोजन कसे व्यवहारी होईल याकडे आपण लक्ष दिले पाहिजे.

**कष्ट** : सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे गरिबी हटविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावयास हवा. सर्व काही आपल्या हातात व मनगटात आहे. तेव्हा आपण अत्यंत कृतिशील असले पाहिजे, उद्यमशील असले पाहिजे. असे आपण करू तर आपल्यापुढे जे प्रश्न आहेत ते सुटल्याशिवाय राहणार नाहीत. आपल्या मनामध्ये अशी एक कल्पना असते की गरिबी हटणारच नाही. ती राहाणारच. पण ही कल्पना चुकीची व निरर्थक आहे. आपले भवितव्य आपण घडविले पाहिजे. गरिबी आपण नष्ट केली पाहिजे. लोकशाही जीवनामध्ये आर्थिक विषमतेला, गरिबीला कुठेही स्थान असू शकत नाही. जो गरिबीला तोंड देऊन प्रयत्न करील तो पुढे येणार आहे. मा. यशवंतरावजींनी दिलेले एक उदाहरण मी आपणापुढे ठेवतो. कबीराचा एक दोहा त्यांनी दिला आहे. एका सरोवराच्या काठी फिरत असता मला तहान लागली, असा आवाज कबीरास ऐकू आला. पाण्याचे सरोवर तर तुडुंब भरलेले आहे मग येथे कोणाला कशी तहान लागली याचा शोध घेत असता कबीराला दिसले की त्या सरोवरातील मासाच हे बोलतो आहे. पाण्यातील माशाने तहान लागली आहे असे म्हणावे हे जसे न पटणारे आहे त्याप्रमाणे भारताला निसर्गाचा वरदहस्त असता, भारत देश संपन्न असता, त्यामधील नागरिकांनी आम्ही गरीब आहोत असे म्हणावे हे बरोबर होणार नाही. जीवनातील आवश्यक ते सुख, धन, कष्टसाध्य आहे हे समजले तर गरिबीचा प्रश्न उरणार नाही. तेव्हा आर्थिक विषमतेच्या दृष्टीने या सर्व बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत. शासन आपल्या परीने काम करील. आपण आपल्या परीने काम केले पाहिजे.

**सामाजिक प्रश्न :** आपल्यापुढे काही सामाजिक प्रश्नही आहेत. जातिव्यवस्था हा त्यांतील फार मोठा प्रश्न आहे. ही व्यवस्था हळूहळू नष्ट होईल. विज्ञानाची जशी वाढ होत जाईल, लोकशाही मूल्ये जशी विकसित होत जातील तसतशी जातिव्यवस्था कमी होत जाईल, अशी आशा बाळगावयास हरकत नाही. दुसरा प्रश्न भाषाभिन्नतेचा. तीन भाषा आपण अवलंबिल्या आहेत. ज्या त्या प्रदेशाची म्हणून प्रादेशिक भाषा, आवश्यक आहे. भावनिक ऐक्याच्या दृष्टीने जरूर तेवढी हिंदी येणे आवश्यक आहे परंतु आंतरराष्ट्रीय दळणवळणाच्या दृष्टीने व त्याबरोबर विज्ञानाच्या दृष्टीने इंग्रजी भाषा येणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ती ज्ञानाची भाषा आहे. आपल्या प्रगतीसाठी, अभिनव भारताच्या बांधणीसाठी इंग्रजी हे फार मोठे प्रभावी साधन आहे. आपली भाषा नसली तरी आपल्या एकंदर फायद्याची म्हणून आपण इंग्रजीकडे लक्ष दिले पाहिजे.

**शिक्षण :** समाजसुखाचे व उद्धाराचे फार मोठे साधन म्हणजे शिक्षण. आज आपण नेहमी असे म्हणतो की शिक्षणाचा दर्जा खाली गेला आहे. लोकशाहीमध्ये शिक्षणाचा दर्जा घसरतो म्हणजे काय ? याचा थोडक्यात असा अर्थ होतो की शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे हे होता कामा नये. शिक्षणाची स्थिती वाईट आहे. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत किंवा माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत ज्या अडचणी, तक्रारी आहेत त्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या बाबतीतसुद्धा आहेत. असे अनेक शिक्षक, अध्यापक आहेत की ज्यांना वेळेवर व बरोबर पगार मिळत नाही. दोनदोन महिने पगार मिळत नाही. पगार वेळेवर मिळाला नाही तर शिक्षक चांगले शिकविणार कसे ? अशाने शिक्षणाचा दर्जा खालावला जाणे शक्य आहे. शिक्षकास वेतन बरोबर न देणे हा त्याच्यावर अन्याय आहेच व पर्यायाने तो एकूण शिक्षणावर व विद्यार्थ्यांवरही आहे.[८] तेव्हा शिक्षकांकडे आपण लक्ष दिले पाहिजे. शिक्षकाला

---

८ अमेरिकेतील महाराष्ट्रीयांचे अंदाजे वार्षिक उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | इंजिनियर | ( केवळ नोकरी ) | १०३२०० ते १२९००० रुपये. |
| २) | डॉक्टर | ( केवळ नोकरी ) | १११८०० ते १२९००० रुपये. |
| ३) | असि. प्रोफेसर | – | १०३२०० ते १७२००० रुपये. |
| ४) | प्रोफेसर | – | २१५००० ते २५८००० रुपये. |
| ५) | सेल्सगर्ल | – | ६०२०० ते ६८८०० रुपये. |

खर्चही मोठा असतो. शिल्लक कमी राहते. तरी ते जीवन जगण्यात येते त्यास काही दर्जा असतो. गबाळेपणाचे, गरिबीचे जिणे नाही.

प्रत्येक सुखसोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. लोकशाहीची ध्येये रुजविण्याचे काम शिक्षकांच्या द्वारा होणार आहे म्हणून शिक्षकाला मोठे स्थान मिळाले पाहिजे.

**कायदा व सुव्यवस्था :** लोकशाहीला आज फार मोठी गरज आहे ती कायदा आणि सुव्यवस्थेची. लोकशाहीमध्ये सर्वांनी संयमाने वागले पाहिजे. लोकशाही हे कायद्याचे राज्य ( The rule of law ) आहे. आपण कितीही देव, दैवाच्या गोष्टी बोलत राहिलो तरी आपले खरे तारण, संरक्षण कायदा करीत असतो. समाजातील स्थैर्य, सुरक्षितता योग्य कायद्याच्या अंमलबजावणीमुळे उपलब्ध होते. आज विद्यार्थी आंदोलनामध्ये भाग घेत आहेत. विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या कारभारामध्ये स्थान मिळणार आहे. त्यांच्या संघटना तयार होत आहेत. वास्तविक त्यांचे कर्तव्य काय ? त्यांचा शिक्षणाचा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. या काळामध्ये त्यांनी शिकले पाहिजे. कारण त्यावर त्यांचे भविष्य अवलंबून आहे. शिक्षण हा त्यांच्या जीवनाचा प्रश्न, त्यांच्या पालकांचा, कुटुंबियांचा प्रश्न आहे. चार वर्षे अभ्यासाची आहेत हे महाविद्यालयीन विद्यार्थ्याने सूज्ञपणे लक्षात ठेवले पाहिजे. विद्यार्थी आणि आंदोलन हे गणित बरोबर नाही. आंदोलनास अनुचित वळण लागले की ते विघातक ठरणार हे सहाजिक आहे. बस जाळणे, रूळ उखडणे, हे बरोबर नाही. हे सर्व कशासाठी ? ही संपत्ती कोणाची आहे ? ही राष्ट्रीय संपत्ती आहे. ती आपल्या सर्वांची आहे. आपण आपल्या राष्ट्रीय संपत्तीचा वापर अत्यंत उत्तम रीतीने करावयास हवा. बंद, घेराव, हिंसक आंदोलनांपासून आपण अलिप्त असले पाहिजे पोलिस बंदोबस्त ठेवतात त्यावेळी त्यांच्यावरही हल्ला करण्यात येतो. हे आपल्या वाचनात येते.ते कर्तव्यबुद्धीने काम करीत असतात. त्यावेळी त्यांच्या कामात राजकीय हस्तक्षेप होता कामा नये. पोलिसांची दडपशाही नाही व पोलिसयंत्रणेत राजकीय हस्तक्षेप नाही, हे संतुलन राखण्यात आले पाहिजे. मा. यशवंतराव चव्हाण म्हणतात त्याप्रमाणे Maximum tact and minimum force हे सूत्र पोलीसयंत्रणेचे असावयास हवे. रहदारी नियंत्रित करण्यासाठी ज्यावेळी पोलिस हात वर करतो त्यावेळी तो आपले स्वातंत्र्य हिरावून घेत नाही त्याला सर्वांचेच नियंत्रण करावे लागते. याचा अर्थ आपल्याला जितके व्यक्तिस्वातंत्र्य आहे तितकेच दुसऱ्यालाही आहे. ज्यावेळी एकाच्या स्वातंत्र्यहक्काचा दुसऱ्याच्या स्वातंत्र्यहक्काशी संघर्ष निर्माण होतो त्यावेळी पोलिस हस्तक्षेप करतो. हा कायद्याने केलेला हस्तक्षेप आहे.लोकशाही ही कायद्याने,

नियमाने चालणारी गोष्ट आहे त्यामुळे त्या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था या गोष्टी असल्याच पाहिजेत. आज घेराव घालण्यात येतात. ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. ती बेकायदेशीर गोष्ट आहे. आपण 'बंद' ही नेहमी पाहतो. आज हे बंद तर उद्या ते बंद. 'बंद' मुळे आपण उत्पादनावर किती नियंत्रण आणतो, आर्थिक विषमतेला आपण कसे कारणीभूत होतो, याकडे आपले दुर्लक्ष होते. 'बंद' ही गोष्ट अत्यंत भयंकर आहे.[९] ब्रिटनमध्ये तीन दिवसांचा आठवडा करण्यात आला होता. पण त्यामुळे उत्पादनावर फार वाईट परिणाम झाला. तेव्हा पुन्हा सात दिवसांचा आठवडा करण्यात आला. बंद वगैरे गोष्टी आपण बंद केल्या पाहिजेत.

**बाह्य सुरक्षितता** : अंतर्गत सुरक्षिततेप्रमाणे बाह्य सुरक्षिततेवरही लक्ष दिले पाहिजे. आपल्या परराष्ट्र नीतीचे सूत्र अलिप्तवादाचे आहे. अलिप्तता याचा अर्थ आपण अलिप्त राहावे असा नव्हे व ते शक्यही नाही. आपल्या अलिप्ततेत शांततेचे ध्येय आहे. अलिप्तता हे सूत्र आहे म्हणून काही करावयाचे नाही असे नाही. आपण समर्थ झाले पाहिजे. असमर्थता दडपशाहीला निमंत्रण देते. जेथे लोकशाही आहे अशा ब्रिटननेसुद्धा अनेक लोकांना दडपलेले आहे. अमेरिकेसारख्या लोकशाही राष्ट्रानेसुद्धा निग्रोवर दडपशाही केली आहे. अशा राष्ट्रांचा डिगो गार्शीया यामध्ये नाविक तळ निर्माण करण्याचा मानस आहे. हिंदी महासागराला मादागास्कर नाव देण्याचा मानस आहे. ही चीड आणणारी गोष्ट आहे. यासाठी आपण समर्थ झाले पाहिजे. सत्य ही अत्यंत उत्तम गोष्ट आहे पण त्याला शक्तीची जोड हवी. आपल्याला सत्याबरोबर समर्थता हवी.

आणखी अनेक गोष्टींचा ऊहापोह करण्यासारखा आहे. पण मला ज्या फार महत्त्वाच्या वाटल्या त्या गोष्टी मी प्रामुख्याने आपल्यापुढे मांडण्याचा प्रयत्न केला. अनेक गोष्टी त्रोटक स्वरूपात सांगितल्या. प्रत्येक गोष्ट विश्लेषण करीत सांगत बसल्यास त्यास खूप अवधी दिला पाहिजे. असो.

**भवितव्य :** आपल्यापुढील आव्हानांचा, अडचणींचा, प्रश्नांचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे व आपला देश सुदृढ, संपन्न, समर्थ, सुंदर

---

९ संप, मोर्चे, बंद इ. गोष्टींच्या स्पेशल पोलिस बंदोबस्तासाठी १९७० साली राज्य पोलिस खात्यास सुमारे ३८०० अधिक ऑफिसर्स, ४७००० अधिक पोलिसांचे सहाय्य घ्यावे लागले. या बंदोबस्तासाठी खर्च सुमारे १२६८००० रुपयेपर्यंत आला.

केला पाहिजे. भारतीय लोकशाहीचे भवितव्य उज्ज्वल आहे. आम्हां भारतीय लोकांजवळ समजुतदारपणा, सूज्ञपणा, संयम आहे. योग्य विचार आहे. चांगल्या गोष्टींचा निवाडा आहे.

भारतीय लोकशाहीचा आशय [१०], पद्धत आणि त्यापुढे असणाऱ्या समस्या व आव्हाने या गोष्टी मी आपल्यापुढे मांडल्या. आपण माझे भाषण शांतपणे ऐकून घेतले याबद्दल मी आपला आभारी आहे.

---

१० लोकशाहीमध्ये लोकांचे जास्तीतजास्त हित, स्वास्थ्य, सुख अभिप्रेत आहे. हे कोणीतरी द्यावयाचे नसून लोकांनीच निर्माण करावयाचे आहे. त्यासाठी त्यांच्या सर्जनशक्तीला, स्वातंत्र्य व समतेची पोषक मूल्ये आहेत. राजकीय सत्तेस कायद्याच्या चौकटीत बसवून लोककल्याण साधून देशाची उन्नती साधणे हा एकूण आशय आहे. यामध्ये सर्वांचेच सुख समाधान आहे. सर्व दलितांचे, आदिवासींचे, गरिबांचे जीवन सुधारले पाहिजे. दारिद्र्यामध्ये सर्वांत जास्त हाल होतात ते अजाण-बालकांचे. वृद्धाश्रम, गरिबाश्रम, बालकाश्रम, धर्मशाळा बांधूनही सर्व थरांतील असहाय्य गरिबांचे जिणे सुसह्य केले पाहिजे. दारूण गरिबीचा प्रश्न सोडविलाच पाहिजे.

आणखी एक गोष्ट आपल्याकडे उपेक्षित आहे. आपल्याकडील भंगी-पद्धती पूर्वापार चालत आलेली तीच आहे. मोठ्या शहरातील ड्रेनेज-पद्धतीचा अपवाद सोडला तर सर्वत्र जुनी रीत अबोलपणे चालू आहे. यासाठी पाश्चात्य देशातील आधुनिक पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. ही दुःखदायी पद्धत पूर्ण नष्ट केली पाहिजे.

आपल्याकडील ब्रिटिशकाळातील असलेले तुरुंग नष्ट करून तेथील जीवनही सुधारले पाहिजे. मानवतेची भूमिका असली पाहिजे. यासारख्या गोष्टी बारीकसारीक वाटून दुर्लक्षिल्या जातात. पण लोकशाहीत मानवी मूल्ये जपणे आवश्यक असल्याने कोणतेही सामाजिक दुःख हलके मानण्याचे व उपेक्षिण्याचे कारण नाही.

★

११-३-१९७४

# लोकशाही समाजवाद

श्री. वि. अ. नाईक
न्यायमूर्ती, पुणे.

# लोकशाही आणि समाजवाद

बंधु-भगिनींनो,

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ६१ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने नगर-पालिकेच्या नगरवाचनालयातर्फे हे जे ज्ञानसत्र आपण सुरू केले आहे; त्यामध्ये सहभागी होण्यास मला खरोखरच अतिशय आनंद होत आहे. आपल्याला आताच सांगितल्याप्रमाणे यशवंतराव हे एकेकाळच्या काँग्रेसमध्ये म्हणजे रॅडिकल डेमोक्रॅटीक पार्टी जी होती त्या पार्टीमध्ये असत. आणि पुढे सुद्धा ज्याला एक स्पिरिट ऑफ डेमोक्रॅटिक थॉट म्हणतात तशी अगोदरचीच रॉयवादी विचारसरणी यशवंतराव चव्हाण यांच्यामध्ये सतत रहात आली आहे. म्हणून आपल्यांपैकी काही लोकांना आठवत असेल की मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांची अहमदाबादला जी दोन व्याख्याने झाली त्या वेळेला त्यांनी आवर्जून या गोष्टीचा उल्लेख केला की मी रॉय यांचा शिष्य आहे. आणि म्हणूनच आज या ठिकाणी मला विशेष प्रकारचा आनंद होत आहे.

आजच्या व्याख्यानाचा विषय लोकशाही समाजवाद असा आहे. लोकशाही समाजवाद हा शब्दप्रयोग देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये दुमदुमून राहिला आहे. ज्याप्रमाणे एखादे नाणे चलनामध्ये असणारे आणि सारखे फिरत राहाणारे हे नाणे सतत वापरल्याने गुळगुळीत होते आणि त्या नाण्याच्या मुद्रा या अस्पष्ट पुसटपुसट अशा दिसायला लागतात तशीच काहीशी स्थिती या लोकशाही समाजवाद या शब्दप्रयोगाची आहे. लोकशाही समाजवाद याचा अर्थ लोकशाहीशी सुसंगत असेल तो समाजवाद. जो समाजवाद लोकशाहीच्या चौकटीत बसू शकेल. ज्या समाजवादाची पूर्तता लोकशाही मार्गाने होऊ

शकेल, संसदेमध्ये कायदा पास करून आणि अन्य मार्गाने होऊ शकेल. अशा समाजवादाला सामान्यपणे लोकशाही समाजवाद असे म्हणतात. याचाच दुसरा अर्थ असा की लोकशाही समाजवादाहून अन्य प्रकारचे भिन्न समाजवाद उपलब्ध आहेत. जगामध्ये अशाप्रकारचे विचारप्रवाह आहेत. लोकशाही समाजवाद हा एक जागतिक प्रवाह आहे. आपण तो आपल्या देशात तयार केलेला नाही. त्याप्रमाणे इतर तऱ्हेचे समाजवादसुद्धा अशांचा उल्लेख मी पुढे करणार आहे ते सुद्धा जगामध्ये निरनिराळया भागामध्ये प्रचलित आहेत. निरनिराळया वेळेला त्यांचा प्रभाव बसत होता आणि काही तऱ्हेच्या समाजवादाचा प्रभाव आज सर्वच पूर्वयुरोप आणि चीन या देशामध्येही पडलेला दिसून येत आहे.

आता यानंतर प्रथमत: आपण लोकशाही म्हणजे काय याचा विचार करू. आजच्या विषयाच्या संदर्भाने लोकशाहीचा अर्थ चार सूत्रांमध्ये मी आपल्याला सांगणार आहे. लोकशाही ही चार खांबांवर उभी असलेली अशी वास्तू आहे. या वास्तूला राजकीय यंत्रणा असे मानायला हरकत नाही. या राजकीय यंत्रणेचे स्वरूप म्हणजे निरनिराळया वेळेला सार्वत्रिक खुल्या मतदानाच्या जोरावर जो पक्ष बहुमताने संसदेमध्ये येऊ शकेल त्या पक्षाचे हातामध्ये राज्याची सूत्रे देणे. लोकशाहीमध्ये दुसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानवी हक्क. ज्या वेळेला आपण आपली राज्यघटना तयार करीत होतो तेव्हा युनोचा चार्ट तयार होत होता. त्यावेळी या मानवी हक्काच्या सनदेची उजळणी त्या ठिकाणी करण्यात आली. मनुष्याला विचाराचे स्वातंत्र्य, उच्चाराचे स्वातंत्र्य वगैरे जी कांही स्वातंत्र्ये आहेत, ज्याला आपण सामान्यपणे व्यक्तिस्वातंत्र्य म्हणतो त्या प्रकारचे स्वातंत्र्य या मानवी हक्कांमध्ये आहे. तिसरी बाब म्हणजे हे मानवी हक्क शाबूत राहावेत म्हणून आणि त्याचप्रमाणे एकंदर लोकशाहीचे कामकाज हे सुव्यवस्थितपणे पार पडावे याकरता म्हणून एकंदर अधिकाराची विभागणी करणे. सगळी सत्ता एकाच संस्थेकडे केंद्रित होता कामा नये. या संस्थांचे विकेंद्रीकरण करायला पाहिजे. एका संस्थेने दुसऱ्यावर अतिक्रमण करता कामा नये. शासनाने संसदेवर अतिक्रमण करायचे नाही. संसदेने आणि शासनाने न्यायासनामध्ये हस्तक्षेप करायचा नाही. अशा तऱ्हेच्या यंत्रणेबरोबर या ठिकाणी एक गोष्ट अभिप्रेत आहे ती म्हणजे न्यायासन स्वातंत्र्य. एकंदर काही सुरळीत रीतीने चालेल हे पाहाण्याची जबाबदारी न्यायासनावर टाकली पाहिजे. इतकी लोकशाहीसंबंधीची ही मीमांसा आजच्या व्याख्यानाच्या दृष्टीने पुरेशी आहे.

आता थोडे ऐतिहासिकदृष्टया या प्रश्नाकडे आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, लोकशाही आणि पुंजीवाद म्हणजे मर्यादित लोकशाही ही ब्रिटनमध्ये प्रथम स्थापन झाली. त्याच सुमाराला ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि त्या वेळेला जी व्यवस्था त्या ठिकाणी अंमलात आली त्याला सामान्यपणे भांडवलशाही किंवा पुंजीवाद असे आपण म्हणतो. या दोन्ही गोष्टींकडे एक समाजवाद आहे. या पुंजीवादाच्या आगमनामुळे या देशात अनेक घडामोडी होऊन गेल्या. आज पुंजीवादाला आपण कितीही नावे ठेवित असलो तरी ज्या काळात तो जन्माला आला त्या वेळेला पुंजीवाद ही प्रगत अवस्था होती. मार्क्सने याचे जे वर्णन केले आहे तशा प्रकारचे वर्णन भांडवलशाहीचे जे स्तुतिपाठक असतील त्यांनाही करता येणार नाही. त्यांनी प्रथम सरंजामशाहीचे कंबरडे मोडले. आणि जी मागणी होती तिचे मूळ उखडून काढले. त्याचप्रमाणे उत्पादनाची शक्ती इतकी वाढवली की प्रथम काम वाढले व उत्पादन वाढले आणि त्यामुळे रशियाचा दर्जा वाढला. ही झाली भांडवलशाहीची जमेची बाजू. पुंजीशाहीची खर्चाची बाजू अशी आहे की या पुंजीशाहीमध्ये जे कामगार कारखान्यामध्ये काम करतात, उत्पादन करण्याकरता म्हणून जे झटत असतात त्यांची अत्यंत शोचनीय अशी अवस्था झाली. त्यांच्या कामाचे तास निश्चित झाले नव्हते. वेतननिश्चिती झाली नव्हती. जर या वेतनावर कोणी यायला तयार नसतील तर मग काम करणाऱ्यांची संख्या बाहेर अमर्याद होती आणि त्यामुळे हायर अॅण्ड फायर हे तत्त्व लागू होऊ शकते. बायकांना कामावर लावण्याचा कोणताही निर्बंध नव्हता. लहान मुलांना कामावर लावण्याचा कोणताही निर्बंध नव्हता किंवा राजसत्ता यामध्ये कोणत्याही तऱ्हेचा हस्तक्षेप करू शकत नव्हती.

आणि त्यामुळे सामान्यपणे जे काही विचारवंत होते ज्यांच्या मनामध्ये काही प्रेमभावना होती त्यांना देखील अतिशय वाईट वाटायला लागले. हे काय चालले आहे ? हे स्वस्थ बसून पाहाण्याची सरकारची जबाबदारी नाही अशा तऱ्हेचा विचार त्या वेळेला प्रभावी व्हायला लागला. त्यानंतर त्याच्याही पुढे जाऊन जी विचारसरणी निर्माण होऊ लागली ती समतेची विचारसरणी होऊ लागली. ज्या प्रमाणात समता देता येईल त्या प्रमाणात दिली पाहिजे आणि म्हणून जी आंदोलने इंग्लंडमध्ये सुरू झाली ती आंदोलने स्थूलमानाने नैतिक प्रोटेस्ट अशी होती. परंतु त्यांची उभारणी समतेची म्हणून त्याला पुढे समाजवादी विचारसरणी असे नाव मिळाले. इंग्लंडमध्ये

या लोकशाही समाजवादाचे प्रवर्तक यांनी हे वैचारिक नेतृत्व आपल्याकडे घेतले होते. आणि त्यांनी जो समाजवाद प्रचलित केला तो समाजवाद हा लोकशाही स्वरूपाचा होता. त्यांचे विचार समाज छिन्नविच्छिन्न करायचा नाही, क्रांती करायची नाही असे होते. त्या मार्गाने गेल्याने काय होईल हे कोणालाच सांगता येणार नाही. इतिहासाने यासंबंधीचा वाटेल तेवढा पुरावा दिला आहे. फ्रान्समध्ये क्रांतीतून प्रतिक्रांती निर्माण झाली. क्रांतीची भाषा न करता संसदेने हळूहळू प्रचार करून ज्या काही ' की इंडस्ट्रीज ' त्यांचे राष्ट्रीयीकरण शक्य तेवढ्या लवकर करावे परंतु राष्ट्रीयीकरणाची घाई करावयाचे काही कारण नाही. जसे जमेल, जशी आवश्यकता भासेल त्याप्रमाणे राष्ट्रीयीकरण करायचे आणि त्याबद्दलचा मोबदला द्यावयाचा. शिवाय एकंदर उत्पादनावर त्याचा काय परिणाम होईल याचाही विचार करावा. कारण जर एका इंडस्ट्रीजचा मोबदला दिला नाही तर दुसऱ्या इंडस्ट्रीजची भीतीपोटी व्हायची नाही या सर्व गोष्टींचा विचार करून सिडने बेबने संथपणाने राष्ट्रीयीकरणाचा मार्ग काढला. पण समाजवादाची-अंतिम समता संधीची संपूर्ण संधी उपलब्ध करून द्यावी हे शासनाचे कर्तव्य होते व अशा तऱ्हेची विचारसरणी ही लोकशाही समाजवादी विचारसरणी प्रचलित झाली. इंग्लंडप्रमाणे युरोपमध्येसुद्धा ती अतिशय लोकप्रिय ठरली. स्वतः मार्क्सही स्वतःला सोशल डेमोक्रॅट असे म्हणत असे.

परंतु काही लोकांना असे वाटावला लागले की राष्ट्राच्या मालकीची संपत्ती केली तर कामगारांचे शासन थांबेल का ? आणि म्हणून प्रत्यक्ष कामगार–जो मालाचें उत्पादन करतो तो कामगार त्याच्या मोबदल्याला वंचित होतो. कारण त्या उत्पादनामध्ये हजारो लोकांची भागीदारी आलेली असते. त्याचप्रमाणे यंत्राचा त्या ठिकाणी उपयोग झालेला असतो. सगळे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे झाले पाहिजेत याला म्हणतात सिंडीकॅलिझम्. कामगारांचे शासन राष्ट्रीयीकरणामुळे थांबत नाही. कारण एका मालका-ऐवजी दुसरा मालक येतो. आणि त्यामुळे कोणाला किती फायदा मिळतो, कामगाराला त्याचा निश्चित किती फायदा मिळतो; हा मुद्दा वादग्रस्त होतो. तेव्हा अशा तऱ्हेने सिंडीकॅलिझमचा विचार असतो. आणि हे लोक आणखी पुढे जाऊन म्हणणार आहेत राज्यसंस्थाच असता कामा नये. अनार्किझम या तत्त्वज्ञानाचा अर्थ असा की राज्यशासनाने एखाद्या पिकलेल्या फळाप्रमाणे गळून पडावे. तेव्हा हा एक विचार आपल्याला सांगितला. ज्याला सिंडीकॅलिझम् म्हणता येईल.

तिसरा विचार जो पुढे प्रभावी वाटला तो लेनिनच्या कर्तृत्वामुळे. लेनिन हा मोठा कर्तृत्ववान मनुष्य. त्याच्या कर्तृत्वाच्या जोरावर रशियासारख्या मागासलेल्या देशामध्ये ही राज्यव्यवस्था पुढे अंमलात आली. पण त्याचा संस्थापक मार्क्स याने तीस सायंटिफिक सोशलिझम हे नाव दिले. प्लेटोने देखील कम्युनिझमची कल्पना सांगितली होती. पण व्यवस्था रोमँटिक केली पाहिजे होती. तिला अंमलात आणण्यासारखी केली पाहिजे म्हणून याला सायंटिफिक सोशॅलिझम हे नाव दिले. अशा तऱ्हेने हे दोन तीन विचार हे युरोपमध्ये बळावत चालले.

आता पुढे प्रश्न असा उपस्थित झाला की साध्य कोणते आणि साधन कोणते? मार्क्सच्या विचारसरणीमध्ये संपूर्ण उत्पादनाच्या साधनाचे राष्ट्रीयीकरण करणे हे साध्य आहे. राष्ट्रीयीकरण हे साध्य की लोकांचे कल्याण हे साध्य आहे, असा मोठा मार्मिक प्रश्न उपस्थित होतो. आणि महात्मा गांधींचे उत्तर असे की तुम्ही सर्वांत गरीब मनुष्य जो तुमच्या आयुष्यात पाहिला असेल त्याचे चित्र तुम्ही तुमच्या डोळ्यांपुढे उभे करा. तुम्ही जी स्टेप घेणार आहात त्याचा प्राथमिक म्हणून त्या माणसाला काही फायदा होईल का याचा आपण विचार करा. भुकेकंगालांना त्यामुळे स्वराज्य मिळेल का याचा विचार करा. याचा अर्थ लोककल्याण हे अंतिम साध्य आणि ही गोष्ट स्वतः लेनिनने मान्य केली आहे. लोककल्याणाच्या कार्यक्रमामध्ये जी गोष्ट समाजवाद सांगत होता तशा तऱ्हेची ही सर्व एकंदर व्यवस्था आहे- ही व्यवस्था निर्माण करण्याकरता म्हणून त्यांनी सांगितले राष्ट्रीयीकरण हे साधन आहे. लोककल्याण हे अंतिम साध्य आहे. आपण आपल्या घटनेमध्ये मार्गदर्शक तत्त्वे म्हणून सांगितली त्यामध्ये लोककल्याणाचा कार्यक्रम दिलेला आहे. परंतु लोकशाही समाजवादाचा कार्यक्रम कोणता असे विचारले तर त्याचे एकच उत्तर आहे लोककल्याणकारी समाजवादी राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था हेच लोकशाहीचे अंतिम असे साध्य आहे असे त्याचे आपल्याला उत्तर द्यावे लागेल. एकच प्रश्न आहे की हे कल्याण साध्य व्हायचे असेल किंवा समता साध्य व्हायची असेल तर अविकसित देशामध्ये हे शक्य आहे का? हे सर्व साध्य करण्याकरता म्हणून आपल्याला विकासाचा कार्यक्रम जारीने अंमलात आणला पाहिजे. उत्पादनाची वाढ झपाट्याने करायला पाहिजे. आणि हे आपण जेव्हा फार मोठ्या प्रमाणात करू आणि लोकसंख्येची वाढ लक्षात घेऊन ज्या वेळेला लोकसंख्येहूनही उत्पादनाची वाढ अधिक करू त्या वेळेला आपल्याला लोककल्याणकारक राज्याची

स्थापना करता येईल. शैक्षणिक सवलत देता येईल. मेडिकल मदत देता येईल. कितीही राष्ट्रीयीकरणे केली तरी त्यामध्ये लोकांना रस नाही. लोकांना कशात रस असेल तर ज्यामध्ये काही फायदा मिळतो आहे की नाही त्यामध्ये आहे. म्हणून अविकसित देशामध्ये लोककल्याणकारी राज्य स्थापन होईल का? तर मला अशक्य वाटते. मार्क्सने असे लिहून ठेवले आहे, समाजवाद त्याच देशामध्ये स्थापन होऊ शकेल ज्या देशातील अर्थ-व्यवस्था अत्यंत प्रगत झाली आहे, अतिशय प्रगत असे यांत्रिक उत्पादन चालू आहे त्याच देशामध्ये समाजवाद येऊ शकेल. म्हणजे भांडवलशाहीची प्रक्रिया पूर्ण झाली म्हणजे त्या ठिकाणी समाजवाद येतो. ज्याप्रमाणे सरंजाम-शाहीचे कार्य संपल्यानंतर भांडवलशाही येते त्याचप्रमाणे भांडवलशाहीचे कार्य पूर्ण झाले, उत्पादनवाढीचे त्याचे कार्य पूर्ण झाले म्हणजे मग समाज-वाद येऊ शकेल. एरवी येणार नाही. रशिया मागासलेला असला तरी समाजवाद येऊ शकला. पहिल्या युद्धात त्याचा अत्यंत भयानक अविकास झाला. परंतु त्यांनी सांगितले की प्रथम लोकांना भाकरी मिळाली पाहिजे, युद्ध थांबवले पाहिजे. अशा तऱ्हेने त्यावेळी लेनिनने घोषणा केली होती. जरी उत्पादनाची सर्व साधने राष्ट्राच्या मालकीची केली तरी आर्थिक विकासाचे कार्य पूर्ण करणे हे अतिशय निकडीचे पहिले काम आहे असे गृहित धरून त्यांच्या पंचवार्षिक योजना सुरू झाल्या. लोकांचे फायदे, वेतनवाढ वगैरे गोष्टी त्यावेळी रशियन नेत्यांना मान्य नव्हत्या. हे विकासाचे कार्य होत असता वेतन कमी करावयाचे, भरपूर लेव्ही घ्यावयाची. अशातऱ्हेने भांडवल संचय करता करता त्यांना हळूहळू १९३९-४० सालापर्यंत भांडवलशाहीची प्रगती गाठायला वेळ लागला.

आता आपण आपल्या देशाकडे वळूया. आपल्या घटनेमध्ये समाजवाद हा शब्द वापरला नाही. तो वापरला नाही त्याचे कारण समाजवाद हा शब्द संदिग्ध शब्द आहे. समाजवाद अनेक तऱ्हेचे आहेत. आणि कायद्यामध्ये जो शब्द वापरायचा तो शब्द संदिग्ध असता कामा नये. आपल्या देशातील शेती हा मुख्य धंदा होय. आपल्या अर्थव्यवस्थेचे एकंदर ७० टक्के उत्पादन शेतीचे आहे. आणि ही शेती जोपर्यन्त खाजगी आहे तोपर्यन्त राष्ट्रीयी-करणाच्या अर्थाने समाजवाद आपल्याला कसा आणता येईल? आणि अशी जोपर्यंत स्थिती आहे तोपर्यंत त्यांना घटनेमध्ये असा शब्द वापरता आला नसता. 'की इंडस्ट्री' हळूहळू पब्लिकमध्ये घ्यायच्या, खाजगी मालकी ठेवायची याला समाजवादाच्या धर्तीची समाजव्यवस्था असा शब्दप्रयोग

वापरला. भुवनेश्वर काँग्रेसमध्ये पुन्हा याचा विचार केला आणि लोकशाही आणि समाजवाद या नावाचा एकदोन हजार शब्दांचा एक ठराव भुवनेश्वर काँग्रेसमध्ये पास झाला. पुढेपुढे राष्ट्रीयीकरणावर अधिक जोर द्यावा, विशेषत: बँकांचे राष्ट्रीयीकरण हा कार्यक्रम होता. त्यावर मतभेद निर्माण झाले आणि त्यानंतर काँग्रेसची दोन छकले झाली. इंदिराजींना वाटत होते राष्ट्रीयीकरण आवश्यक आहे. परंतु बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले तरी याचा अर्थ बँकांचा पैसा राष्ट्राच्या मालकीचा होत नाही. हा पैसा ठेवीदारांच्या मालकीचा असतो. बँका या दलाल असतात आणि म्हणून या अर्थाने प्रश्नाचा विचार केला तरी शासनाला सवलती मिळतील. एकीकडे तुटीचा अर्थभरणा आणि दुसरीकडे बँकांचे कर्ज. तेव्हा हे बँकांचे राष्ट्रीयीकरण करावे किंवा काय याबद्दल वाद झाला. आणि समाजवादाचा निश्चित कार्यक्रम कोणीही आखला नाही. पूर्वीप्रमाणेच तो अत्यंत संदिग्ध ठेवण्यात आला.

या परिस्थितीने काय घडले ? या परिस्थितीत दोन तऱ्हेच्या लोकांनी फायदा घेतला. एक कम्युनिस्ट आणि दुसरा संधिसाधू. कम्युनिस्टांनी राष्ट्रीयीकरणावर भर दिला आणि राष्ट्राची प्रगती किती झाली याचे मोजमाप करायचे असेल तर किती सेक्टर राष्ट्राच्या मालकीचे केले यावर त्यांनी भर दिला. आणि यामध्ये कामगार जे मागेल ते दिले पाहिजे हा विचार आला आणि त्यांनी तसा आग्रह धरला. एकंदरीने कामगारांच्या अपेक्षा पुऱ्या करणे याचे नाव रॅडिकॅरिझम्. हा प्रकार कम्युनिस्टांनी काँग्रेसमध्ये शिरल्यानंतर केला. जे संधिसाधू होते ते निव्वळ संधिसाधूच. घोषणा केली की संपले काम. उच्चरवाने जी काही विचार परंपरा असेल ती एकदा उभे राहून घोषणा केली झाले प्रत्येक व्यवहारामध्ये घोषणा असे यामध्ये मूलभूत आहे आणि म्हणून फार अनर्थ होतो. यामुळे आपण वचनांची खैरात करतो. आपली परंपरा अशी आहे की मंत्रांच्या सामर्थ्यावर आपला विश्वास आहे. आणि त्यामुळे या घोषणाबाजीचा सुकाळ होतो. लोकांना वचनांची खैरात दिली जाते. आणि शेवटी पूर्तता झाली नाही म्हणजे लोकांच्यामध्ये प्रचंड प्रमाणात वैफल्य निर्माण होते ही वस्तुस्थिती आहे. (गुजरातमध्ये चिमणभाई स्वत:ला जहालांचा मुकुटमणी समजत असतो. ) एकाधिकार खरेदीमध्ये विशेष क्रांतिकारक काही नाही. परंतु एकाधिकार खरेदीचा निर्णय घेत असताना सर्वांनी हात वर उचलला. परंतु त्याची जबाबदारी काय याचा विचार कोणी केला नाही आणि ती पार पाडली पाहिजे याची काळजी घेतली नाही. चिमणभाईंनी खेडूत समाजाच्या बरोबर संगनमत

केले. त्यांच्याकडून लॅव्ही मिळणार नाही याची उत्तम व्यवस्था केली आणि आज ते आपल्या गुजराथ प्रांतात प्रांतीय पक्ष काढू इच्छितात. या माणसाचे इतके भयंकर परिवर्तन होऊ शकले. म्हणजे याचा अर्थ उघडउघड असा होतो की नागवी सत्तास्पर्धा करणारा परंतु समाजवादाचा बुरखा पांघरणारा गट कॉंग्रेसमध्ये आहे.

म्हणून समाजवाद हा नुसता घोषणाचा नाही त्याला मोठी शिस्त असावी लागते. फार मोठा त्याग करावा लागतो. फार कष्ट करावे लागतात. चर्चिल हा लोकप्रिय पंतप्रधान पण त्याने आश्वासने दिली नाहीत. तर त्याने उलट लोकांकडे मागणी केली. तुम्ही मला रक्त द्या. निढळाचा घाम द्या. आणि अश्रू द्या. त्याने वचने दिली नाहीत. रशियामध्ये आर्थिक प्रगती सहजासहजी झाली नाही. चाळीस वर्षे त्यांनी कष्ट केले होते. चाळीस वर्षे त्या ठिकाणी कामगारांचे जीवन अतिशय कंगाल झाले होते. आज रशिया जो दिसतो त्याचे फळ रशियाने अत्यंत प्रामाणिकपणे केलेल्या कष्टांत आहे. हिंदुस्थानला हे नको आहे. त्याग करायला नको आहे. कष्ट करायला नको आहे. चीनमध्ये काय घडले. चीनमधील पक्षीय संघटना अत्यंत मजबूत आहे, फार मोठ्या प्रमाणात शिस्त ते लावू शकतात. ते लोकांच्यामध्ये वजन टाकू शकतात आणि त्याबरोबर चीन हा एकजिनसी समाज आहे. आपल्या देशात तसे नाही. चीन वाटेल त्या कष्टाला, वाटेल त्या त्यागाला तयार आहे अगदी अतिशय थोड्या पगारावर ते गुजराण करू शकतात. आपला देश छिन्न-विच्छिन्न झालेला आहे. याठिकाणी प्रांतीय वाद आहेत. जातीयवाद आहेत. एकजिनसी असा देश नाही. या देशाला समाजवादी शिस्त लावणे सोपे काम नाही.

पण ही गोष्ट घडली पाहिजे. नाहीतर आपल्या देशामध्ये समाजवाद येण्याची शक्यता नाही. म्हणून मला आपल्याला असे सांगायचे आहे की, अधिक कष्ट करा आणि नुसत्या घोषणा करू नका. व्यवहारवाद अंगी बाणायला पाहिजे. यशवंतराव हे नुसते पोथीनिष्ठ समाजवादी नाहीत. यशवंतरावजींनी अनेक वेळा सांगितले आहे की मी व्यावहारिक समाजवादी आहे आणि पोथीनिष्ठ समाजवादाला बांध घालणारे असे जर कोणी दिल्लीमध्ये असतील तर ते यशवंतरावजी आहेत. समाजवादाच्या विरुद्ध मी नाही. परंतु ज्या समाजवादाचे निश्चित असे ध्येय आहे, निश्चित असे काही नैतिक पाठबळ आहे तो समाजवाद योग्य आहे. ही व्यवस्था या

देशामध्ये आली असेल तर प्रत्येक वर्गाने शिस्त अंगी बाणली पाहिजे. प्रत्येक वर्गाने जर असे ठरवले की आपण संघटित आहोत म्हणून आपल्या सर्व मागण्या पूर्ण झाल्या पाहिजेत. तर मग देशामध्ये अनवस्था निर्माण होईल. उत्पादन अजिबात खंडून जाईल. तुमचे काही प्रश्न असतील त्याच्या संपादनासाठी तुम्ही जरूर भांडले पाहिजे. परंतु त्याला काही मर्यादा आहेत. संपामुळे उत्पादन थांबते. लोकोकर्मचारी रुळावर गाड्या आणून संप करतात. कोळसा वाहातूक थांबते. इंजिनियर्स संप करतात. यामुळे उत्पादनात खंड पडतो. या प्रकारांना आपण शिस्त लावू शकत नाही. उत्पादन वाढी-शिवाय भांडवलाचा संचय नाही. आणि भांडवलाच्या संचयाशिवाय नवीन रोजगार नाही. तुटीच्या अर्थभरण्याने उत्पादन वाढते का ? थोडेफार. वाढले तरी महागाई भरमसाट वाढते. हा भस्मासूर त्याला खाऊन टाकेल. शेतीचे उत्पादन गेल्या १० वर्षांत वाढले नाही. आपण घोषणा खूप दिल्या होत्या. शेतीच्या उत्पादनाला अग्रक्रम दिला नाही तर नियोजन आधी कळस मग पाया असे होईल. अणि सर्वांत आश्चर्याची आणि लाजीरवाणी गोष्ट म्हणजे सहा हजार कोटींच्यावर भांडवल गुंतवणूक केली. या भांडवलातून नफा काढून त्यातून नवीन उद्योग काढावयाचे नवीन रोजगार निर्माण करायचा तर त्यामध्येच वेळोवेळी घट येत चालली आहे. रशियामध्ये प्रत्येक कारखान्याने नफा दाखविला पाहिजे. नाहीतर त्याला शिक्षा होईल असे आहे. निर्गत बाजाराचा व्यापार तंग आहे. आपण तर अविकसित. आपल्याला प्रगत देशाच्या मालाशी स्पर्धा करावयाची आहे. आपल्याला अनुकूल गोष्ट फक्त एकच म्हणजे लेबर चीप आहे. पण प्रत्यक्षात लेबर चीप नाही. कारण लोक काम करीत नाहीत, कष्ट करीत नाहीत. बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर बँकांची कार्यक्षमता कमी झाली आहे. वेतनाच्या मोबदल्यानुसार भरपूर काम झाले पाहिजे. नाहीतर आपण आंतरराष्ट्रीय बाजारात टिकाव धरू शकणार नाही. आणि असा टिकाव धरला नाही तर व्यापाराची घडगत नाही. निर्गत व्यापार फायद्याचा करायचा असेल तर उत्पादनात वाढ झाली पाहिजे. नानातऱ्हेच्या आपत्ती आपल्यावर येतील आणि त्यामध्ये लोकशाही नष्ट होईल. लोकशाहीने लोकांचे प्रश्न सोडविले पाहिजेत. ज्या लोकशाहीमध्ये

लोकांचे प्रश्न सोडविले जात नाहीत ती लोकशाही टिकत नाही असा इतिहास आहे. आणि म्हणून लोकशाही टिकवायची आहे किंवा नाही याचा आपण गंभीर विचार केला पाहिजे. अशातऱ्हेने प्रश्न आपल्या मनाला आपण विचारल्यानंतर आपण आपल्या मागण्या थोडया कमी केल्या पाहिजेत आणि हे कोणी लक्षात घेत नाही अशी माझी तक्रार आहे. समाजवादाची मोठी शिस्त आपल्या अंगी बाळगल्याशिवाय समाजवाद येणार नाही. जे संधि-साधू आहेत त्यांना कुठल्याही संघटनात घेता कामा नये. मी आपला बराच वेळ घेतला माझे भाषण आपण शांतपणे ऐकून घेतले याबद्दल आपले आभार मानतो. आणि पुन्हा या कार्यक्रमात भाग घेण्याची मला संधी दिली याबद्दल आपले आभार मानून आपली रजा घेतो.

☆

१२-३-१९७४

# अविकसित देशातील समाजवादाचे स्वरूप

श्री. सदाशिव बागाईतकर, पुणे.

# अविकसित देशातील समाजवादाचे स्वरूप

अध्यक्ष महाराज आणि उपस्थित बंधुभगिनी :

बेचाळीसच्या स्वातंत्र्य लढ्यातील आमचे जेष्ठ सहकारी, आजचे भारताचे अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपण जी व्याख्यानमाला सुरू केली आणि त्या निमित्ताने या ठिकाणी येऊन त्यांच्यासंबंधीच्या शुभेच्छा व्यक्त करण्याची संधी मला दिली त्याबद्दल नगरपालिकेचा मी आभारी आहे. आज श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांना त्यांच्या आयुष्यामध्ये अधिक उत्कर्ष लाभो, यश मिळो अशी शुभेच्छा व्यक्त करून, त्यांचे आणि त्यांच्या पत्नी सौ. वेणूताई चव्हाण यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. अध्यक्षांनी सांगितल्याप्रमाणे गेल्या वर्षीच्या भाषणांची ही जी पुस्तिका प्रसिद्ध झालेली आहे. त्याचे प्रकाशन मी सुरुवातीला करतो आणि नंतर मी माझ्या भाषणाला सुरुवात करतो.

आजच्या व्याख्यानाचा जो विषय मी घेतला आहे तो विषय आहे 'अविकसित देशातील समाजवादाचे स्वरूप'. समाजवाद आणि समाजवादासंबंधीच्या भिन्नभिन्न मतप्रणाली यांच्या सूक्ष्म व सैद्धांतिक वादविवादात मी जात नाही, भारतासारख्या अविकसित देशाला सर्वार्थाने आपला कायापालट करायचा असेल, आर्थिक, सामाजिक असे जे प्रश्न आपल्यापुढे उभे आहेत त्यांतून जर मार्ग काढायचा असेल तर समाजवादाशिवाय तरणोपाय नाही. यासंबंधी देशातील बहुसंख्य जनतेमध्ये, विचारवंतांमध्ये

व्यापक एकमत आहे असे आपण गृहित धरतो. एका अर्थाने हे वस्तुस्थितीला धरून आहे. परंतु हा जो 'समाजवाद' आहे त्याचा नेमका आशय काय, त्याच्या प्रेरणा कोणत्या, तो कशा पद्धतीने प्रत्यक्षामध्ये येणार आहे हा प्रश्न आज मतैक्याचा राहिलेला नाही. तसा तो नसणे हेही स्वाभाविक आहे.

समाजवादाचा विचार ज्या युरोपमध्ये प्रथम प्रसृत झाला त्या युरोपमध्ये-सुद्धा आपण असे पाहातो की समाजवादाची अनेक भिन्नभिन्न रूपे आज पुढें आली आहेत. रशियामध्ये राज्यक्रांती झाली आणि पहिलें कम्युनिस्ट राष्ट्र जेव्हा निर्माण झालें, कम्युनिस्ट सरकार बनलें त्यावेळेला असे मानण्यात आले होते की या विसाव्या शतकामध्ये जें मन्वंतर घडायचे आहे, जो नवा मनू निर्माण व्हायचा आहे, त्याची ही नांदी आहे. पुढे आपण असे पाहिले की मार्क्सचा विचार आणि लेनिनचे कर्तृत्व यांचा प्रचंड प्रभाव सगळ्या जगावर पडला. विशेषतः ज्यांना आज मागासलेले देश समजले जाते, जे अविकसित मानवीसमूह आहेत, देश आहेत त्या राष्ट्रांच्यावरदेखील हा प्रभाव फार मोठ्या प्रमाणात पडला. त्याबरोबर कालांतराने युरोपच्या अनेक राष्ट्रांमधून विशेषतः पश्चिम युरोपमध्ये, इंग्लंडमध्ये, स्कँडेनेव्हियन कंट्रीज, स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क म्हणून जी राष्ट्रें आहेत त्या राष्ट्रांमध्ये समाजवादाचा आणखी एक प्रकार नियोजनाच्या द्वारा कामगार संघटनांच्या जबरदस्त सामर्थ्याच्या जोरावर जगापुढे आला. हा प्रकार घडत असताना प्रश्न असा निर्माण झाला की भारतासारख्या देशाने कुठल्या समाजवादाचा स्वीकार करायचा? कोणता समाजवाद हा आपल्या समस्यांना काही उत्तरे देऊ शकेल. या प्रश्नाचे नंतर उत्तर असे ठरले की कम्युनिस्ट राष्ट्रांमध्ये ज्या प्रकारची शासनप्रणाली अमलामध्ये आली आहे, ज्या तऱ्हेची हुकूमशाही निर्माण झाली त्या मार्गाने आपले प्रश्न सुटणार नाहीत. म्हणून लोकशाही समाजवादाच्या मार्गाने, संसदीय पद्धतीने समाजवादाचा जो काही आशय आहे तो आपण आपल्या देशामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशा प्रकारचा विचार प्रबळ झाला. आणि म्हणून समाजवादाची जी चर्चा लोक करतात, विचारवंत करतात, आज ज्या समस्यांबद्दल बोलणार आहोत त्या समाज-वादाच्या क्रियेमध्ये लोकशाही अंतर्भूत आहे, नागरिक स्वातंत्र्य अंतर्भूत आहे, अशा प्रकारची समाजाची एक चौकट अभिप्रेत आहे की ज्याच्यामध्ये शासन-कर्ता वर्ग, सत्ताधारी वर्ग हा जनतेच्या नियंत्रणाखाली जनतेच्या मार्गदर्शना-प्रमाणे काम करीत, जनतेच्या इच्छा-आकांक्षांना काहीएक सगुण रूप देईल. परंतु मुळातच जो विचार एका औद्योगिक क्रांतीनंतर युरोपमध्ये निर्माण

झाला त्या विचाराचे नेमके स्वरूप काय आहे यासंबंधी कदाचित अजून थोडा गोंधळ आहे. काही गोष्टी आपण गृहित धरतो. त्या वस्तुस्थितीमध्ये तशा नाहीत. म्हणून अविकसित देशामध्ये समाजवादाचे स्वरूप काय असले पाहिजे हा प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे.

समाजवादाच्या या स्वरूपाचा विचार करण्यापूर्वी आजच्या जगाची नेमकी वस्तुस्थिती काय आहे, आर्थिकदृष्टया जगाची काय परिस्थिती आहे हेही थोडे पाहिले पाहिजे. आज असे मानले जाते की जगाची विभागणी साम्यवादी राष्ट्रे आणि साम्राज्यशाही राष्ट्रे अशी झालेली आहे. असा विश्वास ठेवणारे, प्रामाणिकपणे असे मानणारे लोक आणि विचारवंत आपल्याही देशामध्ये मोठया संख्येने आहेत. रशियाच्या नेतृत्वाखाली जगामध्ये साम्यवादाचा पुरस्कार करणारा, शांततेची आराधना करणारा एक गट आहे आणि दुसरा गट आहे अमेरिकन साम्राज्यशाहीच्या नेतृत्वाखाली काम करणारा. तो नुसते लोकशाहीचे खोटे ढोंग करतो. घोषणा देतो आणि जगामध्ये आपले सत्तावर्चस्व टिकविण्याचा प्रयत्न करतो. जगाची विभागणी अशा दोन गटांमध्ये झाली आहे. साम्राज्यवादी राष्ट्रे–साम्यवादी राष्ट्रे, शांततावादी राष्ट्रे–युद्धखोर राष्ट्रे अशाप्रकारे जगाची विभागणी झाली आहे असा प्रामाणिकपणे ज्यांचा समज आहे असा एक फार मोठा वर्ग आपल्या देशात आहे. ही विभागणी खरी की खोटी हा वादाचा मुद्दा आपण बाजूला ठेवूया. प्रश्न असा आहे की जगाची विभागणी खरोखर अशीच झाली आहे का ? माझ्या मताने ही विभागणी अशी झालेली नाही. जगाची विभागणी झाली आहे ती गरीब राष्ट्रे आणि श्रीमंत राष्ट्रे अशीही झालेली आहे. आजच्या सबंध जगापैकी ज्यांना भांडवलशाहीने आणि नंतरच्या कम्युनिझमने समृद्धीचे वरदान दिले असा एक छोटा, जगाचा १/३ हिस्सा आहे प्रामुख्याने युरोपीय देशांचा, गौरवर्णीयांचा. काही राष्ट्रांत भांडवलशाहीने व दुसऱ्या काही राष्ट्रांच्यामध्ये नंतर कम्युनिझममुळे उच्च अशा प्रकारचे राहणीमान हे मिळवून दिलेले आहे आणि बाकीच्या २/३ जगाचा मानवसमूह असा आहे की ज्याला आज कुठल्याही प्रकारची जीवनाची शाश्वती नाही. त्यांचे जीवनमान जगातल्या निकृष्ट अशा प्रकारचे आहे. अशी गरीब आणि श्रीमंत राष्ट्रे अशी ही जगाची विभागणी झालेली आहे. आज आपण असे पाहातो की ही विभागणी भौगोलिकदृष्टया जरी डोळयांसमोर आणायची ठरवली तरी आपल्याला दिसून येईल की ही संपत्तिमान राष्ट्रे म्हणजे युरोप (रशियासहित) अमेरिका, कॅनडा असा हा

छोटा समूह आहे. जपान सोडून सबंध आशिया, सर्व आफ्रिका, सर्व दक्षिण अमेरिका ज्याला लॅटिन अमेरिका म्हणतात हा पृथ्वीचा दुसरा राष्ट्रसमूह असा आहे की ज्या ठिकाणी अपार दारिद्र्य आहे. या २० व्या शतकात विज्ञानाची इतकी प्रगती झाली, मनुष्य चंद्रावर गेला त्या विज्ञानाचा ज्याला स्पर्श झालेला नाही, त्या विज्ञानाने जी समृद्धी निर्माण केली ती काय आहे हे ज्यांना समजले नाही असा हा गरीब राष्ट्रांचा समूह आहे. आणि म्हणून भांडवलशाहीने केवळ मजूर आणि मालक अशी जगाची किंवा समाजाची विभागणी केली हे वरवर दिसणारे सत्य खरे नसून भांडवलशाहीने समृद्ध राष्ट्रे आणि गरीब राष्ट्रे अशीही विभागणी जगाची केली आहे हे सत्य आपण लक्षात घेतले पाहिजे.

अमेरिकेमध्ये दरडोई उत्पन्न किती, हिंदुस्थानात दरडोई उत्पन्न किती ? अमेरिकेत किती माणसांमागे टेलिफोन आहे, किती माणसांमागे गाडी आहे, किती माणसांमागे रेडिओ आहे, ही सारी जो केवळ आपल्याला कल्पनासृष्टी वाटते तितक्यापुरतीच ही विभागणी राहिलेली नाही. परिस्थितीने निर्माण केलेली खाई इतकी भयानक आहे की आपल्याला वाटते की ही खाई कशी बुजणारच नाही. काही आंतरराष्ट्रीय निर्देशांक मी आपल्याला मुद्दाम जरा सत्य परिस्थिती कळावी म्हणून वाचून दाखवितो. हिंदुस्थानचे दरडोई उत्पन्न सध्या ५८९ रुपये आहे. अमेरिकेचे हे उत्पन्न २८,६०५ आहे. स्वीडनसारख्या युरोपीय छोट्या राष्ट्राचे दरडोई उत्पन्न २१७८८, कॅनडा १६ हजार, पश्चिम जर्मनी १४ हजार असे हे आकडे आहेत. हेच असे निराळ्या रीतीने व्यक्त झाले आहे. दर माणसांमागे मोटारी किती, टेलिफोन किती, रेडिओ किती इत्यादि. त्याचप्रमाणे हेही आपण लक्षात घेतले पाहिजे की व्यक्तिगत उत्पन्नांच्या या आकड्याबरोबरच आणखी अनेक प्रकारची केंद्रीकरणे या छोट्या राष्ट्रांमध्ये ज्याला आपण पुढारलेले देश किंवा समाज म्हणतो त्या समाजाच्यामध्ये झालेली आहेत. एक साधा विचार, साधे सत्य असे आहे की या प्रगत झालेल्या राष्ट्रांच्यामध्ये दरडोई जे भांडवल आहे ते भांडवल युरोपमध्ये साधारणतः ८ ते १० हजार रुपये आहे. आणि अमेरिकेमध्ये दरडोई १२ पासून २० हजारपर्यंत हे भांडवल गुंतवलेले आहे. हिंदुस्थान-सारख्या देशामध्ये चार पंचवार्षिक योजना झाल्यानंतर दरडोई भांडवलाची गुंतवणूक ज्याच्यावर आपला रोजगार अवलंबून आहे, ती आज २०० ते २५० चे पुढे जात नाही. ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा हा जो संपन्न देशांचा एक छोटा समूह आहे त्या संपन्न देशांच्या समूहात या वस्तुस्थितीची अंगे

औद्योगिक जगतामध्ये सहा टक्के काम करणारा अमेरिकेचा माणूस ह्या शेतीवर राबतो. एकूण कामगारांच्यापैकी बाकीचा चौऱ्याण्णव टक्के श्रम करणारा माणूस उद्योगधंद्यामध्ये किंवा अन्यप्रकारचा व्यवसायांमध्ये काम करतो आणि उद्योगधंद्यामध्ये राबणाऱ्या कामगारापैकी पन्नास टक्क्यांहून अधिक कामगार ' व्हाईट कॉलर ' म्हणून ज्याला आपण पांढरपेशा म्हणतो अशा प्रकारचे जगत तेथे झालेले आहे. याचा अर्थ काय ? याचा अर्थ असा की औद्योगिक क्रांतीनंतर ज्या प्रकारचा श्रमजीवी वर्ग निर्माण होईल अशी कल्पना होती त्या श्रमजीवी वर्गाच्या स्वरूपामध्ये मूलभूत स्वरुपाचा फरक पडलेला आहे, बदल झालेला आहे. मेहनत करणारा, श्रम करणारा श्रमजीवी याच्याऐवजी ज्याला आपण पांढरपेशा वर्ग म्हणतो अशा प्रकारचा श्रमजीवी वर्ग त्या देशामध्ये निर्माण झाला आहे. यातून नव्या प्रकारचे सामाजिक संबंध, नव्या प्रकारच्या भविष्यकालासंबंधीच्या आणि उन्नतीसंबंधीच्या कल्पना निर्माण झालेल्या आहेत. अशा प्रकारचा बदल गेल्या वीस पंचवीस वर्षाच्या काळामध्ये औद्योगिकदृष्टया पुढारलेली जी राष्ट्रे आहेत त्या राष्ट्रांमध्ये होतो आहे. म्हणून समाजवादाची चर्चा करताना कुठला नमुना आपल्याला अनुकूल ठरेल याची आपण चर्चा करू त्या वेळेला आपल्या असे लक्षात येईल की ज्या नमुन्यामध्ये दरडोई वीस हजार रुपये भांडवल गुंतवावे लागेल, ज्या नमुन्यामध्ये शेकडा सहा टक्के लोक फक्त शेतीवर अवलंबून राहातात, ज्या नमुन्यामध्ये पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक लोक पांढरपेशा म्हणून काम करतात असा नमुना आपल्या देशामध्ये कदापी चालणे शक्य नाही. म्हणून आपल्याला नव्या मार्गाची चर्चा करताना, नव्या उपक्रमाची चर्चा करताना आपल्या देशातील आर्थिक परिस्थितीचे भान जर ठेवायला पाहिजे असेल तर आपल्या नियोजनाचा, आपल्या औद्योगिक श्रमाचा, सर्वस्वी निराळ्या दृष्टीने विचार करणे क्रमप्राप्त झाले आहे. आज ह्या विचार आपण फारसा आणि पुरेशा प्रमाणात केलेला नाही. त्यातून आपल्या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

म्हणून पहिली गोष्ट जर या अविकसित राष्ट्रामध्ये लक्षात घ्यायला पाहिजे असेल तर ती ही आहे की या राष्ट्रामध्ये उपलब्ध असलेली मनुष्यशक्ती. त्या मनुष्यशक्तीचा पूर्ण वापर केल्याशिवाय कुठल्याही प्रकारच्या यांत्रिक अवजारांच्या मदतीने आपल्याला भांडवलाचा संचय करता येणार नाही. आणि मी आपल्याला मुद्दाम सांगू इच्छितो या गोष्टीचे भान चीनने ठेवले. चीनमध्ये मनुष्यशक्तीचा वापर केल्याकारणाने माओ-त्से-तुंगला चीनची

प्रगती आज जी झाली आहे त्या प्रमाणात करता आलेली आहे. लोकशाही आणि हुकूमशाहीचा याच्याशी संबंध नाही. अचूक दृष्टी ठेवून एका विशिष्ट शिस्तीने आपल्या ठरलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणे हा याचा अर्थ आहे. म्हणजे आपण जर असे म्हणाल की माओ-त्से-तुंगची हुकूमशाही चीनमध्ये आहे म्हणून हे सगळे घडले तर ते बरोबर नाही. कारण नियोजनासाठी आर्थिक धोरण बिनचूक असे पाहिले तसे ते आर्थिक धोरण एका विशिष्ट शिस्तीने निरपवाद रीतीने अंमलात आणण्याचा संकल्प केलेले सरकारही आवश्यक आहे. असा संकल्प ज्या सरकारपाशी नसेल ते सरकार आर्थिक नियोजन यशस्वी करू शकत नाही हे हिंदुस्थानच्या आजच्या उदाहरणावरून आपण लक्षात घेतले पाहिजे. आज चीनमध्ये टेलिफोनसारखी गोष्ट खाजगी नाही. टेलिफोन एकतर सरकारी आहे. किंवा सार्वजनिक आहे. खाजगी वापरण्यासाठी चीनमध्ये टेलिफोन नाही. मोटारगाड्या सरकारी आहेत. खाजगी मोटारगाड्या चीनमध्ये नाहीत. चीनमध्ये जास्तीतजास्त खाजगी वाहन जे आहे ते म्हणजे सायकली आहेत. मोटारगाड्या खाजगी मालकीच्या कोणाच्या नाहीत. चीनमध्ये मंत्र्यांपासून तो सामान्य शिपायांपर्यंत एक विशिष्ट प्रकारचा कपडालत्ता हाच वापरला पाहिजे या नियमाची निरपवाद रीतीने अंमलबजावणी होत आहे. याला कोणीही अपवाद नाही. याला नागरी जीवन अपवाद नाही. याला कोणीही अपवाद नाही. चौ-एन-लायचा अपवाद नाही. म्हणून चीनमध्ये नियोजनाचे जास्तीतजास्त उपक्रम करीत असताना आपल्या मनुष्यशक्तीचा जास्तीतजास्त वापर करण्याचे जे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवले त्यातून चीनला एक भांडवल संचयाचा नवा आधार मिळाला. आज हिंदुस्थानमध्ये बेकारीची चर्चा आपण करतो. सुशिक्षित बेकार, अशिक्षित बेकार, अर्धबेकार, पूर्णबेकार विविध प्रकारच्या त्यांच्या कॅटीगरीज करून त्यांचे समूह करून आपण एका कामाचा विचार करतो आहोत. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की लक्षावधी लोक काहीही काम करू शकत नाहीत. अशामुळे किती जबरदस्त प्रमाणात देशाचे मूळ भांडवल आपण पाण्यामध्ये टाकल्यासारखे करीत आहोत. श्रम करण्यास माणूस तयार असून, श्रमातून निर्मिती ही स्वाभाविक गोष्ट असून त्या निर्मितीला इथे वाव नाही. अशाप्रकारे आज परिस्थितीचा बनाव बनलेला आहे. आज जे नियोजन आपण करीत आहोत त्या नियोजनामधून या मनुष्यशक्तीचा वापर ही दुय्यम गोष्ट झाली आहे. हिंदुस्थानमध्ये कॉम्प्युटर बसवून हजार कारकुनांचे काम एका यंत्रामार्फत किंवा तीन हजार कारकुनाचे

काम एका यंत्रामार्फत करणे यात आपण गैर काही मानत नाही! कारण आपण असे समजतो आहोत की कार्यक्षमता याचा अर्थ अत्याधुनिक यंत्र आणणे आणि कार्य करणे. यंत्राची कार्यक्षमता आपण वापरतो आहोत तर माणसाची कार्यक्षमता आहे तीही आपण टिकवू शकत नाही अशा विरोधाभासामध्ये आपण सापडलो आहोत. म्हणून हिंदुस्थान हा अविकसित समाजाचा एक जर प्रातिनिधिक नमुना असेल तर हा प्रातिनिधिक नमुना डोळयांपुढे ठेवून आपण ज्या वेळेला विचार करू त्या वेळेला आपण हे लक्षात घ्यायला पाहिजे की समाजवादाचे पायाभूत महत्त्वाचे जे कार्य आहे त्यांत भांडवलाच्या निर्मितीचाही समावेश आहे. ही भांडवलाची निर्मिती करण्यासाठी सामाजिकदृष्टया ज्याप्रमाणे व्यक्तिगत नफा हा आपल्याला बंद करायला पाहिजे त्याचप्रमाणे ही भांडवलाची निर्मिती करताना उपभोग्य वस्तू आणि व्यक्तिगत चैन यांच्यासंबंधी कडक प्रकारची नियंत्रणे घातली पाहिजेत. याची काटेकोर अंमलबजावणी होईल या दृष्टीने जर त्याची आपण काही व्यवस्था करू शकलो नाही तर भांडवल संचयाचा जो प्रश्न आहे तो आपल्याला कधीही सोडवता येणार नाही. मी एक उदाहरण देतो. आपण दोनतीन महिन्यांपूर्वी वर्तमानपत्रामध्ये एक बातमी वाचली असेल. छेलाराम नावाचे एक करोडपती व्यापारी आहेत. मुंबईमध्ये या छेलारामांच्या चिरंजीवांचे लग्न निघाले. मुलाचे लग्न निघाल्यानंतर मुलाने केस कसे राखावे, भांग कसा पाडावा हे ठरविण्यासाठी छेलारामने लंडनहून न्हावी बोलावला! ताजमहाल हॉटेलमध्ये तो राहायला आला. या न्हाव्याचा टाईम्समध्ये फोटो आला, त्याची मुलाखत आली. या छेलारामने आपल्या मुलाच्या नुसत्या एका दिवसाच्या लग्नासाठी त्या लंडनच्या हजामाला लंडनहून बोलावून विमानाचे जाण्यायेण्याचे भाडे दिले, ताजमहालमध्ये त्याला ठेवला आणि या सगळयावर हजारो रुपये उधळल्याची जगजाहीर बातमी आपण माझ्याप्रमाणेच वाचली असेल. वाहयात प्रकारचा खर्च करू नये, उधळपट्टी करू नये, साधेपणा असावा हा नुसता उपदेश काय कामाचा? ठीक आहे. ज्या समाजामध्ये छेलारामसारखा एखादा करोडपती सर्व गोष्टी तुच्छ समजून अशी चौफेरपणाने करतो आणि उधळपट्टी व श्रीमंतीचे घृणास्पद प्रदर्शन हे वर्तमानपत्रामध्ये छापून आल्यानंतरसुद्धा त्याचा काहीही बंदोबस्त शासन करीत नाही, त्या समाजामध्ये आर्थिक धोरणाच्या बाबतीत कुठल्याही प्रकारचे नियमन आहे, कुठल्याही प्रकारची शिस्त आहे, किंवा सरकार त्यासंबंधी संकल्पपूर्ण वर्तन करीत आहे असे मानायला माझ्यासारखा

माणूस तयार होणार नाही. हे एक उदाहरण मी आपल्याला सांगितले, अशी शेकडो उदाहरणे सांगता येतील.

या समाजाचे एक मुख्य वैशिष्ट्य मघाशी मी आपल्याला सांगितले, ते कृपा करून पुन्हा आपण लक्षात घ्या की अविकसित समाजामध्ये विषमतेची खाई जास्त असते. मूठभर श्रीमंत आणि कोट्यावधी गरीब. अशाप्रकारे केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे तर सामाजिकदृष्ट्यासुद्धा सर्वस्वी वंचित, उपेक्षित असा मोठा मानवी समूह अविकसित राष्ट्रामध्ये जास्तीतजास्त असतो. या देशातला आदिवासी, या देशातला नवबुद्ध किंवा अन्य हरिजन, या देशातला शेतमजूर, या देशातला छोटा ५/७ एकरवाला शेतकरी हा बहुसंख्य समाज या समाजाला कुठल्याही प्रकारची प्रतिष्ठा नाही. या समाजातला निम्मा वर्ग स्त्रियांचा. कुठल्याही प्रकारची सामाजिक प्रतिष्ठा या स्त्रीला प्राप्त नाही. अशाप्रकारे समाजातील निम्मा भाग हा एका प्रकारच्या बंधनामध्ये आहे. उपेक्षेमध्ये आहे. ज्याला कोणतेच व्यक्तिमत्त्व नाही असा हा प्रचंड समूह आहे. अशा समाजामध्ये शेकडो छेलाराम व त्यांचे स्वैर वर्तन चालू ठेविले तर आर्थिक समता सोडाच पण समाजाच्या प्रचंड उपेक्षित जनतेला एखादवेळचा पोटभर घास देणेही जमणार नाही. विषमतेचे हे फार बोलके व दुःखद प्रदर्शन आहे. म्हणून अविकसित समाजाला आपल्या समाजवादाच्या स्वप्नासंबंधी विचार करित असताना पहिला प्रमुख संकल्प जर कुठला करायचा असेल तर या समाजामध्ये केवळ निर्गुण ब्रह्माची चर्चा करून उपयोग नाही. भारताचे शासनकर्ते व बहुतेक सर्व राजकीय पक्ष ह्या निर्गुणाच्या आनंदामध्ये नेहमी डुबकत असतात. आपण ज्याप्रमाणे तत्त्वज्ञानामध्ये, धर्मतत्त्वामध्ये निर्गुणाची चर्चा करतो, परमेश्वराचे रूप काय, परमार्थाचे स्वरूप काय, स्वर्गाचे रूप काय तशी आर्थिक आणि सामाजिक मूल्यांचीसुद्धा आपण निर्गुण चर्चा करीत असतो. माझ्या म्हणण्याचा अर्थ कृपा करून असा करू नका की मी निर्गुणाला काही महत्त्व देत नाही. आदर्शासाठी, उच्च मानसिक विकासासाठी निर्गुणाचे महत्त्व आहे. पण केवळ निर्गुणाचीच चर्चा तुम्ही समाजात करीत राहिलात तर पाखंड निर्माण कराल. निर्गुणाच्या सगुण रूपाची प्रत्यक्ष अनुभूती लोकांना येण्याच्या दृष्टीने, समता असो, आर्थिक संरक्षण असो, सामाजिक प्रतिष्ठा असो अशा मूल्यांचे प्रत्यक्ष अनुभूतीचे जे महत्त्व आहे ते जर समाजामध्ये तुम्ही रुजविले नाही तर समाजामध्ये फक्त ढोंग वाढत राहाते. आज आपल्या देशात नेमके हेच घडलेले आहे. हाच आपल्या रोजच्या अनुभवाचा भाग आहे. म्हणून

आर्थिक वा सामाजिक उद्दिष्ट ठरवीत असताना त्याचे निर्गुण रूप काय आणि सगुण रूप काय हे ठरवले पाहिजे. ज्याला हिंदुस्थानात समता निर्माण करायची आहे, आर्थिक आणि सामाजिक समता निर्माण करायची आहे त्याला कठोरपणे सांगितले पाहिजे की हिंदुस्थानसारख्या समाजामध्ये छेलारामसारख्याचे जे त्याचे वैभव आहे, ते राहाणार नाही, ते राहाता कामा नये. हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. कारण छेलाराम हा या समाजाच्या आजाराचे प्रदर्शन आहे. या समाजामध्ये एखाद्या व्यक्तीने, एखाद्या छोटया समूहाने साऱ्या समाजाला तुच्छ लेखून स्वत:च्या वैभवाचे नागवे प्रदर्शन करण्याचा जो निलाजरेपणा वाढला आहे. अशा अल्प समाजाचे छेलाराम प्रतीक आहे. हे प्रतीक जनतेमध्ये राहू शकते ? हे प्रतीक परिवर्तनाच्या कुठल्या प्रतिमेमध्ये राहू शकते ? याचे स्पष्ट ' नाही ' हेच उत्तर असले पाहिजे. आणि कुठलेही सरकार असो ज्या सरकारला लोकांना समतेच्या जवळ न्यायचे आहे, ज्या सरकारला लोकांच्यामध्ये नवे काहीतरी घडत आहे असा अनुभव निर्माण करायचा आहे, त्या सरकारला अशा प्रकारचे वर्तन करण्याचे स्वातंत्र्य कोणालाही राहाणार नाही याची खबरदारी घ्यावीच लागणार आहे जे सरकार अशी खबरदारी घेणार नाही ते समाजमानसात समाजवादाच्या आणि समतेच्या मूल्यांबद्दलचा संभ्रम आणि संशय निर्माण करण्याचा अपराध करणार आहे

आज आपल्याला असे दिसत आहे की, राष्ट्रीयीकरणाची कल्पना घ्या, राष्ट्रीय सेवेची कल्पना घ्या. या प्रत्येक कल्पनेचे अवमूल्यन जे झालेले आहे आणि हे सर्व म्हणजे एक प्रचंड थोतांड आहे, प्रत्यक्षामध्ये काही नाही अशा प्रकारचे जे दूषित वातावरण समाजामध्ये निर्माण झाले आहे त्याचे कारण केवळ निर्गुणाची चर्चा आणि सगुणाची उपेक्षा हे गेल्या पंचवीस वर्षाच्या स्वातंत्र्योत्तर कालातला समाजाचा अनुभव. उद्याचा जो स्वर्ग निर्माण होणार आहे त्याची थोडीफार पुसट ओळखदेख सातत्याने तुम्ही जनतेला करून दिली पाहिजे. सर्व अविकसित देशांच्यामध्ये थोडेफार असेच झालेले आहे.

सगुण–निर्गुणातला फरक कसा महत्त्वाचा आहे हे आपण कृपा करून लक्षात घ्या. प्रत्येक मोठ्या शहरामध्ये आणि कऱ्हाडसारख्या छोटया शहरामध्ये झोपडपट्टयांची चर्चा आपण नेहमी करतो. झोपडपट्टीमध्ये घाण आहे, झोपडपट्टीमध्ये सर्व प्रकारचे सामाजिक दुर्गुण आहेत इत्यादि. आपण

बोलत असतो. काही त्याच्यात सत्यांश असतो, काही काल्पनिक गोष्टी असतात. आज मुंबईसारख्या शहरामध्ये साठ लाख वस्ती जिथे झालेली आहे. त्या शहरामध्ये १० ते १२ लाख लोक झोपडपट्टीमध्ये किंवा फूटपाथवर राहातात ही वस्तुस्थिती आहे. आणि ही स्थिती कानपूर, मद्रास आणि दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरांमध्ये तुम्ही गेलात तर तुम्हांला पाहायला मिळेल. मला आपल्याला असे विचारायचे आहे की ह्या गरीब देशामध्ये जे कोणी राज्यकर्ते असतील त्या राज्यकर्त्यांना ह्या परिस्थितीची काही बोच आणि जाण असेल तर किमान त्यांनी स्वतःच्या आचरणात तरी काहीतरी प्रत्यंतर आणून दिले पाहिजे की नाही? गांधी ज्या वेळेला दिल्लीमध्ये जाऊन भंगी कॉलनीमध्ये राहायचे तेव्हा ते काही थोतांड नव्हते. ते एक प्रकारचे आयडेंटीफिकेशन होते की मी या भंग्यांच्याकडे राहातो. गांधींनी तेव्हा सांगितले की भंग्याची मुलगी हिंदुस्थानचा राष्ट्राध्यक्ष झालेली पाहावी हे माझे स्वप्न आहे. नुसता भंगी नव्हे. भंगी हा तर समाजातला सगळ्यात उपेक्षित, आणि उपेक्षितांच्यातला उपेक्षित म्हणजे हिंदुस्थानातील स्त्री. तेव्हा भंग्याची मुलगी हिंदुस्थानचा राष्ट्राध्यक्ष झालेली मला पाहायची हे माझे स्वप्न आहे हे जे काही गांधी सांगत ते गांधी भंगी कॉलनीमध्ये रहात याला काहीतरी यथार्थता होती. हिंदुस्थानचे राष्ट्रपती दुर्दैवाने आज ज्या व्हाईसरॉयच्या बंगल्यात राहातात, १६०० एकरांचे आवार आहे त्या बंगल्याचे आणि दुनियेतील बलाढ्य राष्ट्र असलेल्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या व्हाईटहौसचे आवार साडेतीन एकरांपेक्षा जास्त नाही. सगुण–निर्गुणाचा हा मुद्दा आहे. एका दिवसात गरिबी दूर करता येत नाही. हा वादाचा मुद्दा नाही. पण गरिबी दूर करण्याचा ज्यांनी संकल्प केलेला आहे त्यांनी गरीबांच्या बरोबर एकरूप होण्याची काहीना काही पद्धती आणि मार्ग शोधून काढून तसे केल्याशिवाय गरीबांना त्यांच्यात काही तथ्य वाटणार नाही. गरिबी हटाव हे जर थोतांड व्हायचे नसेल तर याशिवाय अन्य मार्ग नाही ही गोष्ट आपण लक्षामध्ये घ्या. समाजवादाच्या आशयाशी याचा संबंध जवळचा आहे. कारण सबंध अविकसित राष्ट्रांच्यामधून आज आपण असे पाहतो आहोत की नव्याने सत्ताधारी बनलेले लोक सर्वत्र भारतीय राज्यकर्त्यांचे प्रमाणेच साधारणतः वागत आहेत.

समाजवादाच्या सगुण–निर्गुणाचा विचार पायाभूत विचार म्हणून स्वीकारला पाहिजे. हा समाजवाद येणार कसा, काय, त्याचे वाहक कोण हे जर ठरवायचे असेल तर त्यांनी दुसरी बाजू लक्षात घेतली पाहिजे. या

समाजामध्ये आज कर्तृत्वाची जबरदस्त विषमता आहे. आज यशवंतरावजींचा वाढदिवस आहे म्हणून आपण इथे जमलो आहोत. मी मघाशी महाविद्यालयामध्ये विद्यार्थी मित्रांना सांगितले की आपण जर अवतारवादी नसू तर पुन्हा एखादा गांधी जन्माला येईल, पुन्हा एखादा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्माला येईल आणि तो साऱ्या या समाजाचा उद्धार करील असे जर आपल्याला मानायचे नसेल तर हिमालयाचे कर्तृत्व असलेला एखादा माणूस आणि बाकी सगळी प्रचंड लक्षावधी लोक, कोटयावधी लोक केवळ किडा-मुंगीप्रमाणे अशी कर्तृत्वाचीही विषमता चालणार नाही. सर्वसामान्य माणसाची कार्यक्षमता, वैचारिक कुवत, त्याचे व्यक्तिमत्त्व व त्याचे एकूण कर्तृत्व हा लोकशाहीचा कणा आहे. लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर कर्तृत्वामधली भयानक विषमता जी आज हिंदुस्थानसारख्या देशामध्ये आपल्याला दिसते आहे ती दिसून चालणार नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळात शेकडो नामवंत नेते निर्माण झाले. गावाचे, तालुक्याचे जिल्ह्याचे, राज्याचे, देशाचे ते या मुशीतून, या प्रक्रियेतून निर्माण झाले की ते आपल्या बरोबर आपला गाव, आपला समूह घेऊन उठले. आपल्या नेतृत्वातील काही कुवत, काही कार्यक्षमता त्यांनी आपल्या अनुयायांना शिकवली आहे. आणि पुरुषार्थी बनविणे हा लोकशाहीचा आणि समाजवादाचा गाभा आहे असे लक्षामध्ये ठेवा. असे झाले तरच उत्पादन, संरक्षण, स्थानिक व विविध पातळीवरील नेतृत्व व जनतेचा सर्व लोकशाही प्रक्रियेतील सहभाग हे साध्य होईल.

समाजवादाचा जो विचार आपण करतो त्या विचारामध्ये सामान्य माणसाचे कर्तृत्व आणि कार्यक्षमता याचाही अंतर्भाव आहे. याचा विकास व्हावा म्हणून स्थानिक पातळीवरचे नेतृत्व, त्याची कुवत, त्याची ताकद वाढविणे अशी प्रक्रिया सुरू केली पाहिजे. सत्तेच्या केंद्रीकरणामधून ही प्रक्रिया कधीही विकास पावणार नाही. आज दिल्ली आणि मुंबई, किंवा केंद्र व राज्य अशी हिंदुस्थानच्या सबंध लोकशाही घटनेची ही दोन खांबाची द्वारका आहे. दिल्ली आणि मुंबई. तुम्ही म्हणाल आमच्याकडे जिल्हापरिषदा आहेत, नगरपरिषदा आहेत त्याचं काय ? माझ्या अर्थाने ते सत्तेचे विकेंद्रीकरण नाही. ते सत्तेचे काही अंशी वाटप आहे. आज खऱ्या अर्थाने सत्ता जिल्हापरिषदांच्या हातांमध्य नाही, तर त्या ठिकाणी चीफ एक्झिक्युटिव्ह म्हणून जो कोणी असतो त्यांच्या हातामध्ये काही सत्ता असते. मुंबई, पुणे महानगरपालिकांच्यासारख्या ज्या स्वायत्त संस्था आहेत त्यांच्यामध्ये खरी

सत्ता कमिशनरच्या हातांमध्ये असते त्या ठिकाणी लोकांना भाषणे करण्या-पलिकडे काहीच फारसे करता येत नाही. कारण केंद्रीकरण आर्थिक साम-र्थ्याचे नको तसे राजकीय सामर्थ्याचेही केंद्रीकरण अविकसित देशाला मारक ठरणार आहे. त्यांच्या विकासाच्या आड ते येणार आहे. हे जर खरे असेल तर खऱ्या सत्तेचे विकेंद्रीकरण हीही प्रक्रिया आपल्याला सुरू करायला पाहिजे. ही प्रक्रिया खेड्यापासून दिल्लीपर्यन्त कशारीतीने अंमलात येईल याची तरतूद समाजवादाच्या आशयामध्ये आपल्याला करावी लागेल. दिल्ली आणि मुंबई असे न करता जिल्हा, तालुका, ग्रामपंचायत इथपर्यंत या गोष्टींचे विकेंद्रीकरण आपण करू शकलो नाही तर सामान्य माणसाच्या कर्तृत्वाला वाव आणि विकास होण्याच्या दृष्टीने काही करता येणार नाही. हे करायचे म्हणजे अनेक गोष्टी कराव्या लागतील. नुसता हा कायदा करून चालणार नाही. ग्रामपंचायतींना पण अद्यापी इंग्रजी परिपत्रके येतात.

सबंध अविकसित देशांच्यामध्ये जे तणाव आहेत ते केवळ अधिकारांच्या बाबतीत नाहीत. भाषा, भूषा, भोजन आणि भवन म्हणजे आपल्या जीवनाला व्यापणाऱ्या सर्व महत्त्वाच्या बाबतींत हे तणाव वाढले आहेत. एकीकडे सामंती भाषा, सामंती भूषा, सामंती भोजन आणि सामंती भवन यांचा ज्याला लाभ झालेला आहे असा एक छोटा गट आहे आणि दुसरीकडे लोकभाषा, लोकभूषा, लोकभोजन आणि लोकभवन. प्रश्न फक्त वर्ग-संघर्षाचा नाही. तो तर आहेच. पण त्यालाही ग्रासणारी जी सामाजिक, सांस्कृतिक बाजू आहे, जातिसंस्थेने हजारो वर्षे जी विषमता निर्माण केली आहे त्याचा हा प्रताप आहे. अविकसित भारतीय समाज जात व दारि-द्रयाच्या जात्यातून हजारो वर्षे भरडला जात आहे. समाजवादाचे कोणतेही स्वरूप याची दखल घेऊन उपाययोजना करणार नसेल तर फक्त शब्द-जंजाल निर्माण होईल व मूळ बैठक कायम राहील. अविकसित देशामध्ये हाही मूलभूत झगडा आहे. इथे केवळ वर्गसंघर्ष अपूर्ण आहे. वर्गसंघर्षा-बरोबर भारतीय समाजामध्ये एकप्रकारचा जबरदस्त वर्णसंघर्ष आहे. वर्गसंघर्ष आणि वर्णसंघर्ष एकजुटीने उभे केल्याशिवाय समाजवादी क्रांतीचे इंधनच निर्माण होणार नाही. प्रचलित व्यवस्था, नीतिमूल्ये, परिवर्तनाच्या संकल्पना, या सर्वांवर परंपरागत उच्चवर्ग व धनिकशाही यांची घट्ट पकड आहे. ही पकड कायम रहावी म्हणून भ्रष्टाचाराचे हत्यारही हा वर्ग वापरीत आहे. या परंपरागत व्यवहारांचेवर निर्भय प्रहार करण्याचा पुरुषार्थ सामान्य माणसांत निर्माण झाला, त्यासाठी निर्भयपणे उभे रहाण्याचा

त्याचा आत्मविश्वास वाढला तरच तो इतिहासाचा निर्माता बनू शकेल. भारतीय समाजात हजारो वर्षं जनसामान्य इतिहासाचे फक्त प्रेक्षक म्हणून वावरला आहे. त्याला या इतिहासाचा निर्माता करण्यानेच व्यक्ती व समूहाचा कायापालट करण्याचे कार्य सुरू होईल. हे प्रयत्नसाध्य आहे याची प्रचीती गांधी-युगात याच सातारा जिल्ह्याने दिली आहे. समाजवादाचा संघर्ष अशाप्रकारे सर्वंकष व सर्वव्यापी करणे, परिवर्तनासाठी जनसामर्थ्याची तरफ वापरणे, हीच अविकसित समाजातील समाजवादाची अचूक दिशा ठरण्याची शक्यता आहे.

★